सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, ०२ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १९० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com







## सिल्लोडमध्ये पालकमंत्री अब्दुल सत्तार यांचे विरोधात भाजपा तर्फे भव्य मोर्चा



सिल्लोड प्रतिनिधी : मोर्चेकरी पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात घोषणा देत होते. शिवना येथील गणेशोत्सवा दरम्यान झालेल्या कार्यक्रमातील गोंधळाने भाजप कार्यकर्त्यांवर अजिंठा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले होते यानंतर माजी खासदार रावसाहेब दानवे यांनी अजिंठा येथे रास्ता रोको आंदोलन करून अब्दुल सत्तार यांचेवर तीव्र शब्दात टीका केल्या होत्या. त्यास प्रतिउत्तर म्हणून मागील आठवड्यात पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या समर्थकांच्या वतीने दानवे यांचे विरोधात सिल्लोडला मोर्चा काढून दानवे यांचा निषेध करण्यात आला होता.

सोमवार रोजी शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकातून भव्य मोर्चा शहरातील मुख्य रस्त्याने तहसील कार्यालयावर काढण्यात आला या ठिकाणी मोर्चाचे रूपांतर जाहीर सभेत झाले. या सभेत प्रास्ताविक करताना माजी आमदार सांडू पाटील लोखंडे यांनी सिल्लोडला पाकिस्तान केले असे दानवे यांनी म्हटले होते त्यांच्या बोलण्याचा विपर्यास करून पालकमंत्री अब्दुल सत्तार हे तालुक्यातील परिस्थिती बिघडविण्याचा प्रयत्न करीत आहेत असा आरोप केला.

अल्पसंख्यांक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष मुलतानी यांनी बोलताना तालुक्यातील विकास कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असून केवळ आपल्या नातेवाईकांनाच कामाचे टेंडर वाटप करीत असल्याचा आरोप अब्दुल सत्तार यांच्यावर केला.

यावेळी लक्ष्मीकांत दांडगे, वकील संघाचे अध्यक्ष अशोक तायडे, कमलेश कटारिया, पुष्पाताई काळे, ठगण भागवत, महेश शंकर पेल्ली, बद्री राठोड,सुनील पाटील मिरकर, ज्ञानेश्वर मोठे यांचीही भाषणे झाली.

या मोर्चात सिल्लोड सोयगाव तालुक्यातून मोठ्या प्रमाणात नागरिक सहभागी झाले होते.

## सणासुदीआधी गॅस सिलेंडर महागला, इतक्या रूपयांची वाढ

मुंबई: ऑक्टोबर महिना हा सणासुदींचा महिना असतो. या महिन्यात नवरात्र, दसरा, दिवाळी या सणांची रेलचेल आहे. दरम्यान, या सणासुदीच्या महिन्याच्या पहिल्याच तारखेला गॅस सिलेंडरच्या दरात वाढ झाली आहे. गॅस किंमतीमध्ये ही वाढ १९ किलोग्रॅमच्या कमर्शियल सिलेंडरमध्ये झाली असून ४८.५० रूपये प्रति सिलेंडर झाली आहे. एलपीजी सिलेंडरचे नवे दर आज १ ऑक्टोबर २०२४ पासून देशभरात लागू करण्यात आले आहेत.

देशाची राजधानी दिल्लीमध्ये १९ किलोग्रॅमच्या एलपीजी सिलेंडरचे दर आता १७४० रूपये झाले आहेत. यात ४८.५० रूपयांची वाढ करण्यात आली आहे. गेल्या महिन्यात हे भाव १६९१.५० रूपये इतके होते. कोलकातामध्ये १९ किग्रॅमच्या सिलेंडरचे दर आता १८५०.५० रूपये झाले आहेत. यात ४८ रूपयांची वाढ झाली आहे. गेल्या महिन्यात हे दर १८०२.५० रूपये इतके होते.

मुंबईत एलपीजी सिलेंडरचे दर आता १६९२ रूपये झाले आहेत. यात ४८ रूपयांची वाढ झाली आहे. सप्टेंबर महिन्यात हे दर १६४४ रूपये होते. चेन्नईत १९ किग्रॅच्या सिलेंडरचे दर आता १९०३ रूपये झाले आहेत. यात ४८ रूपयांची वाढ झाली आहे. सप्टेंबर महिन्यात हे दर १८५५ रूपये होते. दरम्यान, सामान्य गृहिणी वापरत असलेल्या १४.२ किग्रॅ वजनाच्या सिलेंडरच्या दरात कोणतेही बदल झालेले नाहीत.

## पंतप्रधानांचा ५ ऑक्टोबर रोजी असणार ठाणे दौरा!
### अनेक रस्ते बंद; 'असे' असतील पर्यायी मार्ग

मुंबई : सध्या राज्यभरात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरु केली आहे. केंद्रीय मंत्री अमित शाह दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर आहेत. तर येत्या ५ ऑक्टोबरपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देखील महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी हे अनेक पायाभूत सुविधा प्रकल्पांचे उद्घाटन करणार आहेत. दरम्यान, पंतप्रधान मोदी ५ ऑक्टोबर रोजी ठाणे दौऱ्यावर असून ते ठाणे येथे रोड शो नंतर ते रॅलीला संबोधित करणार आहेत. यावेळी सुमारे ४० हजार लोक उपस्थित राहण्याची शक्यता असल्यामुळे ठाण्यातील अनेक रस्ते बंद करण्यात आले आहेत. मात्र प्रवाशांचा खोळंबा टळण्यासाठी प्रशासनाकडून पर्यायी मार्ग उपलब्ध करण्यात आले असून प्रवाशांनी सहकार्य करावे, असे आवाहन देखील करण्यात आले आहे.

## १६ कोटी ९६ लक्ष निधीच्या रस्ता कामांचा आ.लक्ष्मण पवारांच्या हास्ते आज उद्घाटन

गेवराई: मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तालुक्यातील मादळमोही ते शहाजानपुर , रा.म.मा ६१ ते खडकी मनकापुर प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रा.म.मा.६१ तळेवाडी,ते वडगावढोक, तर २०,२३,२४ अर्थसंकल्प योजनेंतर्गत तळेवाडी ते माजलगांव रोड रस्ता कामांचे आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून मंजुर झालेल्या रस्ता कामांचे आज २ ऑक्टोबर रोजी सकाळी ११:०० वाजता तळेवाडी येथे उद्घाटन करण्यात येणार आहे तरी सर्व ग्रामस्थांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले अआहे

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तसे अर्थसंकल्प योजनेंतर्गत गेवराई तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मादळमोही ते शहाजनपुर ५/६०० कि.मी.४ कोटी १२ लक्ष ३५ हाजार रूपये निधीचा रस्ता, रा.म.मा.६१ खडकी,मनकापुर रस्ता ५/५०० ३ कोटी ९२ लक्ष ९ हाजार रूपये किमंतीच्या रस्ता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रा.म.मा ६१ तळेवाडी ते वडगावढोक ३/५०० कि.मी. ४ कोटी ९२ लक्ष ३४ हाजार रूपये निधीच्या रस्ता, अर्थसंकल्प २०,२३,२४, योजनेंतर्गत गेवराई विधानसभा मतदारसंघातील रस्ता कामांचे उद्घाटन करण्यात येणार आहे.








Toll Free Number: 1800 266 0018

INDIA'S FIRST 5 YEAR WARRANTY *Conditions apply

$ADDITIONAL CASH DISCOUNTS ON Flipkart

Special offers for CSD/CPC/Corporate employees. Reach us at: institutionalsales@heromotocorp.com

Hero MotoCorp Ltd. Regd. Office: The Grand Plaza, Plot No.2, Nelson Mandela Road, Vasant Kunj Phase - II, New Delhi - 110070, India. | CIN: L35911DL1984PLC017354 | For further information, contact your nearest Hero MotoCorp authorised outlet or CALL TOLL-FREE 1800 266 0018 or visit us on www.heromotocorp.com. Accessories and features shown may not be a part of standard fitment. Always wear a helmet while riding a two-wheeler. #Offer is for a limited period or till stock lasts. Offer amount may vary for model/variant and states. For more details, please visit your nearest authorised Hero outlet. *This represents the maximum potential value achievable by combining all four schemes (i.e.GoodLife Benefit, Insurance, RSA, and Free Service) available for scooters only. Actual value may vary, offer is for a limited period only or till stock lasts. ~Offers will be communicated at the time of invoicing and may vary for model/variant and states, valid on invoicing between 3rd Oct'24 to 12th Oct'24 or till stock last, For more details, please visit your nearest authorised Hero outlet. Offer is valid only on paid bookings with a minimum amount of ₹1100 before 2nd Oct' 24,T&C apply. ^Finance offer is at the sole discretion of the Financier, subject to its respective T&Cs. Available at select dealerships. $Flipkart offers are subject to the sole discretion & T&Cs of Flipkart.

AUTHORISED DEALERS: AKLUJ: Sonaj Hero: 9289922340; AKOLA: Manav Hero: 9289922980, Goenka Hero: 9821737628; AHMEDNAGAR: Ilakshi Hero: 9289922398, Saideep Hero: 9289922485; AMRAVATI: Shree Shreyas Hero: 9289922312, Parshv Hero: 9289923141; AURANGABAD: Raj Hero: 9289922307, Raghuvir Hero: 9289922469, Dhanlaxmi Hero: 9289922962; BARAMATI: Mahalaxmi Hero: 9289922390; BARSHI: Parshwa Hero: 9289923205; BEED: Deep Hero: 9289922343; BHANDARA: Sairaj Hero: 9289922335; BHUSAWAL: Chaudhari Hero: 9289922439; BULDANA: Chopra Hero: 9289922601; BUTIBORI: Thaparsons Hero: 9289922677; CHALISGAON: Sanklecha Hero: 9289922994; CHANDRAPUR: Parshv Hero: 9289922766, N D Hero: 9289922981; CHIPLUN: Konkan Hero: 9289922349; CHAUFULA: Varsha Hero: 9289922795; DHULE: Navkar Hero: 9289922549, Yash Hero: 9289923081; GADCHIROLI: Aryan Hero: 9289922586; GADHINGLAJ: Samarth Hero: 9289923043; GONDIYA: Deepak Hero: 9289922479; HINGOLI: Maruti Hero: 9289922744; ICHALKARANJI: Popular Hero: 9289922770; ISLAMPUR: Venkatesh Hero: 9289923050; JALGAON: Satpuda Hero: 9289922304; JALNA: Priyanka Hero: 9289922539; KAMPTEE: Khushbu Hero: 9289923066; KARAD: Anu Hero: 9289922338; KHAMGAON: Shradha Hero: 9289922574; KUDAL: Mulraj Hero: 9289922336; KOLHAPUR: SMG Hero: 9289922308, Unique Hero: 9289922716; LATUR: Indomobil Hero: 9289922339; MUMBAI: BHIWANDI: New Preet Hero: 9289923080; CHEMBUR: Trademark Hero: 9289923179; MALAD: Automiles Hero: 9289922883; NAHUR(MULUND): Rydex Hero: 9289923148; MAHIM: Fortpoint Hero: 9289922303; SAKINAKA: Raj Hero: 9821742387; NAVI MUMBAI (NERUL): Avenue Auto: 9289923817 ;THANE: PANCHPAKHADI: Ranjeet Hero: 9289922566; GB ROAD: Ranjeet Hero: 9289922566; KALYAN: Avenue Hero: 9289923142; ULHASNAGAR: Avenue Hero: 9289923142, Shree Laxmi Hero: 9821749351; PANVEL: HM Hero: 9289922468; URAN: HM Hero: 9289922468; VIRAR: Fortpoint Hero: 9289922541; VASAI[East]: TrademarkHero: 9289923179; ALIBAUG: Tam Hero: 9821696067; VASAI[West]: FortpointHero: 9289922541; BOISAR: Dhanani Hero: 9289923149; MALEGAON: Regent Hero: 9289922334; MIRAJ: Siddhivinayak Hero: 9289922467; MANMAD: Sanklecha Hero: 9289922939; NAGPUR: Kusumgar Hero: 9289922301, Aditya Hero: 9289924302; Kamptee Road, Teka Naka: Unnati Hero: 9289923022; Central Avenue Road: Unnati Hero: 9289923216; Pratap Nagar: Gurudev Hero: 9289923029; NANDED: Ridewell Hero: 9289922310, Shri Sai Hero: 9289922810; NASIK: Jitendra Hero: 9289922305, Kamal Hero: 9289922396, Shivang Hero: 9289922405; OSMANABAD: Pratibha Hero: 9289922683; PANDHARPUR: Sumankirti Hero: 9289922431; PARATWADA: Shree Sainath Hero: 9289922961; PARBHANI: Tadeshwar Hero: 9289922341; PARLI: Govind Hero: 9289922775; PHALTAN: Borawake Hero: 9289922342; PIMPALGAON: Boraste Hero: 9289922811; PUNE: Chinchwad: Sehgal Hero: 9289922306; Wakad: Pratibha Hero: 9289922681; Baner: Pratibha Hero: 9289922681; Wagholi: Mokha Hero: 9289922957; Paud Road: Kundan Hero: 9289922617; Dhankawadi: Saideep Hero: 9289922996; Swargate: Lakshya Hero: 9289923143; Hadapsar: Saideep Hero: 9289923180; Sinhagad Road: Namaha Shivay Hero: 9289923181; Phugewadi: Samrat Hero: 9821749060; Kothrud: Dharati Hero: 9821748343; PUSAD: Soni Hero: 9289923069; RAHATA: SaiRaje Hero: 9289922823; RATNAGIRI: Gandhi Hero: 9289922793; SOLAPUR: Laxmi Hero: 9289922309, Chavan Hero: 9289922692; SANGLI: Ghatge Patil Hero: 9289922311; SANGAMNER: Padmavati Hero: 9289922598; SATARA: Samrat Hero: 9289922337; SHAHADA: Yash Hero: 9289922456; SHIRUR: Digvijay Hero: 9289923137; SHRIRAMPUR: Badhe Hero: 9289922728; TALEGAON: Khandge Hero: 9289922956; UDGIR: Sai Hero: 9289922603; WALUJ: Dhanlaxmi Hero: 9289922691; WARDHA: G.M. Hero: 9289922496; WASHIM: Sohan Hero: 9289922717; YAVATMAL: Darwha Road: Parvati Hero: 9289922344; Bhayanagar: Parvati Hero: 9289923139 Hero Sure (Buy, Sell, Exchange any Used Two Wheeler): Bhiwandi: New Preet Hero: 9289924206; CHAWFULA: Varsha Hero: 9289924207; NAGPUR: Aditya Hero: 9289924202; Kusumgar Hero: 9289924204; AURANGABAD: Dhanlaxmi Hero: 9289924203; NANDED: Ridewell Hero: 9289924205; Associate Dealer: Ramwadi, Pune: Tyre Trax 9821748351

FCB INTERFACE/6878/OCT2024/MAR

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गोरंट्याल म्हणजेच आयत्या बिळात नागोबा -अर्जुनराव खोतकर

## बेगाने शादी मे अब्दुला दिवाना -अरविंद चव्हाण; जालन्यात घडुन आला त्रिवेणी संगम

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला राज्यात अपेक्षीत यश मिळाले नाही. रावसाहेब दानवे यांचाही पराभव झाला. जनादेश रावसाहेब दानवे यांनी स्विकारला. पराभव झाला असला तरी जालना जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टिने ज्या कामांची सुरुवात त्यांच्या कार्यकाळात झालेली होती. जे प्रकल्प हाती घेण्यात आलेले होते. ती कामे आज पूर्णत्वाकडे जात आहेत. त्यासाठी रावसाहेब दानवे हे आजही सरकार दरबारी जातात. कामे कशी पुर्ण होतील याचा प्रयत्न करताहेत अशी माहिती भास्कर दानवे यांनी यावेळी दिली.

जालना वैद्यकिय महाविद्यालयाला १०० विद्यार्थी क्षमतेसह सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरीता केंद्र शासनाच्या आरोग्य मंत्रालयाकडून परवानगी देण्यात आली. याबाबतीत माहिती देण्यासाठी मंगळवार (दि १) रोजी दुपारी आयोजित करण्यात आलेल्या महायुतीच्या पत्रकार परिषदेत भास्कर दानवे हे बोलत होते.

वैद्यकिय महाविद्यालासाठी रावसाहेब दानवे यांनी जे.पी नड्डा राज्याच्या





दौर्यावर असतांना भेट घेतली होती. त्यावर नड्डा यांनी रावसाहेब दानवेंना दिल्लीत बोलवले. त्यांनी नंतर दिल्लीला जावून जे.पी. नड्डा यांची भेट घेतली. नड्डा यांनी आरोग्य खात्यातील प्रमुख अधिकार्यांची बैठक घेऊन जालन्याच्या मेडिकल कॉलेजसह राज्यातील भंडारा, वाशीम, हिंगोली, अमरावती, गडचिरोली बुलढाणा, अमरनाथ येथील कॉलेजला मान्यता देऊन प्रत्येकी १०० प्रवेश क्षमतेस मंजुरी दिली. या शिवाय नाशिक व जीटी हॉस्पीटलसाठी प्रत्येकी ५० प्रवेश क्षमतेस मंजुरी मिळाली आहे. अशा प्रकारे ९०० जागांना रावसाहेब दानवे यांच्यामुळे मंजुरी मिळाली आहे. जालना वैद्यकिय महाविद्यालयासह इतर ९ जिल्ह्यातील महाविद्यालयांचा प्रश्न चुटकीसरशी सोडविला गेला आहे. त्यामुळे यात कुणीही राजकारण करु नये, ज्याचे श्रेय त्याला देण्यास हरकत काय असा प्रश्नही यावेळी भास्कर दानवे यांनी उपस्थित केला.

वैद्यकीय महाविद्यालयासाठी केंद्र सरकारच अडथळे निर्माण करत असल्याचे वक्तव्य खा. डॉ. कल्याण काळे यांनी केले होते. त्यावर असे लांच्छनास्पद वक्तव्य खा. काळे करतात, त्यांना चॅलेंज आहे की, कोणता अडथळा केंद्र सरकारने आणला हे दाखवून द्यावे. एखादा पुरावा द्यावा, जालना जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टिने काळे यांचे वागणे हे न शोभणारे आहे, पराभूत झाल्यानंतरही रावसाहेब दानवे हे अधिकारी- मंत्र्यांना भेटून काम करताहेत. जालन्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरु होत आहे. याचे काळे यांनी स्वागत करायला हवे. परंतु तसे न करता ते टिका टिप्पणी करताहेत हे लांच्छनास्पद असल्याचेही भास्कर दानवे म्हणाले.

वैद्यकिय महाविद्यालयाच्या जागे संदर्भात शहरापासून जवळील विविध जागा आम्ही जिल्हाधिकारी यांना सुचविल्या, वैद्यकिय मंत्र्यांना देखील येथील जागेबाबत बोललो आहे. रेवगाव येथील २०० एकर असलेली जागा दाखविली. येथील ग्रामपंचायतकडुन जागा मिळवून देण्यात येणार असल्याचेही सांगितले. याव्यतिरिक्त विविध जागाबाबत जिल्हाधिकारी व संबंधीत अधिकार्यांशी भेटलो, बोललो. आम्ही फोटो सेशन केले नाही एवढेच. जागेवर जाऊन फोटो काढायची त्यांना सवय झालेली आहे. असे फोटो काढून कट आऊट लावून जाहिरातबाजी करुन श्रेय भेटत नसते असा टोलही श्री खोतकर यांनी आ. गोरंट्याल यांना लगावला. खोतकर म्हणाले की, जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषाप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात देशातील डॉक्टरांची संख्या कमी आहे. ती वाढविणे गरजेचे असल्याने तसेच ग्रामीण व आदीवासी भागात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने देशात नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याचा निर्णय घेतला होता. त्यात १४ महाविद्यालये ही महाराष्ट्र राज्यात सुरु करण्याचा धोरणात्मक निर्णय आठ वर्षांपुर्वीच घेण्यात आला होता. केंद्राच्या निर्णयामुळे देशातील महाविद्यालयांची संख्या वाढणार आहे. यापुर्वी मुंबई व नाशिक येथील महाविद्यालयांना मंजुरी देण्यात आली होती. आता जालनासह इतर जिल्ह्यातील वैद्यकिय महाविद्यालयांना केंद्राने मंजुरी दिली आहे. नविन महाविद्यालयांमुळे एमबीबीएस विद्यार्थी प्रवेश क्षमतेत आठशे ने वाढ होत आहे. राज्यातील महायुतीच्या सरकारमधील वैद्यकिय मंत्री असलेले गिरीश महाजन व नंतर हसन मुश्रीफ यांनी सातत्याने राज्यातील वैद्यकिय महाविद्यालयांच्या मंजुरीसाठी केंद्राकडे पाठपुरावा केला आहे. माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनीही केंद्रात जे.पी. नड्डा यांच्याशी चर्चा करुन जालनासह राज्यातील वैद्यकिय महाविद्यालयांचा प्रश्न मार्गी लावला आहे. केंद्र आणि राज्यात आमच्या विचारांचे सरकार आहे. त्यामुळे केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, मी



(अर्जुनराव खोतकर), अरविंद चव्हाण यांच्या प्रयत्नांमुळे हे सर्व शक्य झाले आहे. आमदार केवळ श्रेय घेण्यात पटाईत असल्याचा आरोपही यावेळी खोतकर यांनी केला. जालना शहर महानगर पालिकेसाठी सोलर पॅनलचा प्रस्ताव आम्ही पाठवला आहे. तर या महाशयांनी सोलार साठी १०० कोटी मंजुर झाल्याच्या बातम्या छापून आणल्या. १५ कोटी नाट्यगृहासाठी मंजुर झाल्याचे आमदार सांगताहेत तर ते पैसे कुठयं, पत्रकारांनीही शहानिशा करुन वृत्त छापवीत अशा कानपिचक्याही श्री खोतकर यांनी घेतल्या. आमदार पत्रकार परिषद घेतात, प्रेस नोट काढतात त्यामुळे आपल्याला छापावे लागत असेल, आपल्या छापण्याबद्दल कोणतेही दुमत नसल्याचेही खोतकर म्हणाले. विधानसभेत बोलण्यासाठीच पाठवलं जाते. हे फुकटचे श्रेय घेतात आयत्या बिळावर नागोबा आहेत. निर्णय हे सरकार घेत असते, त्यामुळे तुमचे सरकार आले की, तुम्ही आना प्रकल्प नंतर सांगा असा सल्लाही यावेळी खोतकर यांनी आ. गोरंट्याल यांना दिला. केवळ सध्या आमदार असल्यामुळे आयते श्रेय घेत आहेत, पुढे निवडणुका आलेल्या आहेत त्यामुळे हे सर्व सुरु आहे. माजी राज्यमंत्री खोतकर यांनी सविस्तर बाजु मांडल्यामुळे जास्त काही बोलण्यासारखे नाही मात्र, एवढं सांगतो की, बेगाने शादी मे अब्दुला दिवाना अशी आमदारांची अवस्था झाली असल्याची टिका राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) अरविंद चव्हाण यांनी केली. ड्रायपोर्ट, सिडको, वंदे भारत ट्रेन, रेल्वे स्टेशनचे नुतनीकरण से एकना दोन हजारो कामे जालन्यात झालीत काही सुरु आहेत. फुकटचे श्रेय घेण्याचा हा प्रयत्न आहे, मात्र जनता सुज्ञ आहे त्यामुळे यांचे निवडणुकीसाठीचे चाललेले हे प्रयत्न जनता हानून पाडेल असेही श्री चव्हाण म्हणाले.

## संक्षिप्त

### शासकीय वैद्यकीय जालना महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.सुधीर चौधरी यांचा मा.राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्याकडून सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना येथील नव्याने सुरू झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सन.२०२४=२५ या चालु शैक्षणिक वर्षापासून प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे त्यामुळे या वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉक्टर सुधीर चौधरी यांनी माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांची दर्शना बंगला भाग्यनगर येथील भेट घेतली व वैद्यकीय महाविद्यालय व प्रवेश प्रक्रिया संदर्भात सविस्तर चर्चा केली महाविद्यालय महाविद्यालयातील बांधकाम व इतर बाबीवर . बैठकीमध्ये चर्चा झाली.यावेळी खोतकर यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी एकबाल पाशा ,शालम खानपठाण शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले, मेघराज चौधरी, भगवान अंभोरे,सरपंच राहुल गवारे, दीपक वैद्य, शुभम टेकाळे, यासह शिवसेना युवासेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिवसेना गटाच्या पदाधिकाऱ्याचे विविध मागण्यासाठी जलकुंभावर चढून शोले स्टाईल आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील नागरिकांच्या विविध समस्यांबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी ता. ३० सोमवार रोजी जालना रस्त्यावरील पिण्याच्या पाण्याच्या जलकुंभावर चढून शोले स्टाईल आंदोलन करण्यात आले, भोकरदन तालुक्यातील सरसकट शेतकऱ्याचे कर्ज माफ करा,संजय गांधी निराधार योजनेच्या मंजूर लाभार्थ्यांना तात्काळ अनुदान वाटप करण्यात यावे,भोकरदन शहराला सुरळीत पाणी पुरवठा करा,राशन कार्ड वाटप करा,जालना ते सिल्लोड रात्री एक अतिरिक्त बस सेवा सुरू करा, श्रावणबाळ, दीव्यांग, गोरगरीब विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात यावे, पिएम किसन योजनेच्या प्रलंबित शेतकऱ्यांना तात्काळ लाभ मिळवून देण्यात यावा., भोकरदन ते पेरजापुर, भोकरदन ते वाडी रस्त्याचे काम तात्काळ करण्यात यावे, तसेच तहसील कार्यालयातून मिळणारे विविध दाखले, रेशन कार्ड विना विलंब तात्काळ इशू करणे यासह विविध मागण्यांसाठी पिण्याच्या पाण्याच्या जलकुंभावर चढून तब्बल दोन तास शोले स्टाईल आंदोलन करण्यात आले त्यानंतर, त्यानंतर दरम्यान तहसीलदार संतोष बनकर यांना निवेदन देण्यात आले, या आंदोलनात उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव तालुकाप्रमुख कैलास पुंगळे, तालुका प्रमुख नवनाथ दौड शहर प्रमुख महेश पुरोहित, प्रदीपपैठणकर, राजू शेळके, बोरसे गुरुजी, कृष्णा तराळ,रमेश सोनवणे,ज्ञानेश्वर सहाने,संतोष सुरडकर,सुरेश कचके, यांच्यासह मायला व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने सहभागी झाले होते,

## लोकहिताची विकास कामे समन्वय ठेऊन तत्परतेने पार पाडा -खा.डॉ.कल्याण काळे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

ग्रामीण पाणीपुरवठा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनांसह विविध योजनेंतर्गंत मंजूर असणाऱ्या लोकहितांच्या विकास कामांतील सत्यता तपासून पाहा तसेच ती कामे कोणाच्याही दबावाला बळी न पडता समन्वय ठेवून तत्परतेने पार पाडा, असे निर्देश जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) चे अध्यक्ष तथा खासदार डॉ.कल्याण काळे यांनी दिले. जालना जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आज आयोजित 'दिशा' समितीच्या आढावा बैठक पार पडली. यावेळी खासदार डॉ.काळे बोलत होते. बैठकीला सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, आमदार कैलास गोरंट्याल, आमदार राजेश राठोड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुनिल पठारे, यांच्यासह समिती सदस्य यांची यावेळी उपस्थिती होती.

लोकहिताची विकास कामे करतांना प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींच्या कुठल्याही दबावाला बळी न पडता जिल्ह्यातील ग्रामीण रस्त्यांच्या कामासह इतरही कामे तातडीने सुरु करुन वेळेत पुर्ण करावीत. प्रधानमंत्री आवास योजनेतील शहरातील व ग्रामीण भागातील दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या फरकाबाबत प्रस्ताव सादर



करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच अनुसूचित जाती व जमाती तसेच अल्पसंख्याक समुदायाच्या नागरिकांना घरकुल मंजुरी करण्याच्या सुचनाही दिल्या. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत स्वयं सहायता गट स्थापन झालेल्या बचतगटांना बँकांकडून निधी मिळण्यास येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात.

तसेच जाफराबाद व भोकरदन तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांनी विहिरीसाठीचा प्रस्ताव दाखल केला आहे त्यांची पडताळणी शासन नियमांन्वये करून तातडीने विहिरींची मंजूरी करण्यात यावी, अशी सुचनाही खासदार डॉ.काळे यांनी केली. बैठकीत समितीचे अध्यक्ष डॉ.काळे यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजना,राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता योजना, स्वच्छ भारत मिशन, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण ज्योती योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, सर्व शिक्षा अभियान, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, मध्यान्ह भोजन योजना, संजय गांधी निराधार योजना, डिजीटल भारत, सर्व शिक्षा अभियान, जल जीवन मिशन, उमेद, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध लाभाच्या योजना आदी योजनांचाही यावेळी आढावा घेतला. जालना महानगर पालिकेच्या शहरातील टाकाऊ कचऱ्याच्या विल्हेवाट लावण्यासाठीच्या कामासह इतर कामांबाबतही दिशा समितीचे अध्यक्ष तथा खासदार डॉ काळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. केंद्रीय योजनाची अंमलबजावणी करण्यासाठी दिशा समिती काम करत असते. यात एकूण २२ विषय समाविष्ट आहेत. केंद्राच्या विविध योजना तालुकास्तरावर प्रलंबित न ठेवणे तसेच विकास कामात दिरंगाई झाल्यास तपासणी करणे आदी कामे दिशा समितीकडून करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली. केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेतील कामे, लाभार्थ्यांची संख्या जाणून घेत उपस्थित लोकप्रतिनिधी व सदस्यांनी विविध सूचना केल्या. यावेळी बैठकीला संबंधित उपजिल्हाधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, अभियंता यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

## नवदृष्टी महाअभियानांतर्गत २७० नागरिकांची नेत्र तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**अंबड /प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील दि ३० सप्टेंबर वडीगोद्री येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्मयोगी अंकुशराव टोपे यांच्या जयंती समाह निमित माजी आरोग्य मंत्री तथा धनसांवगी मतदार संधाचे आमदार राजेश टोपे एच. व्ही. देसाई हॉस्पिटल पुणे यांच्या संकल्पनेतून नवदृष्टी महाअभियान मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शखक्रिया शिबिराचे आयोजन ३० सप्टेंबर सोमवारी रोजी सकाळी ९.३० वाजता करण्यात आले होते. या शिबिरात - एकूण २००नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. याम ध्ये २०० पैकी ८० नागरिकांमध्ये दृष्टीदोष आढळून आला असून वा रुग्णावर मोतीबिंदू - शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तपासणी शिबिरामध्ये मोतीबिंदू निदान झालेल्या रुग्णांना एच.व्ही. देसाई हॉस्पिटल, पुणे येथे जाण्या - येण्यासाठी समता फाउंडेशनच्या माध्यमातून मोफत वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. दृष्टीदोष आढळलेल्या रुग्णासाठी अल्प दरात चष्मे वाटप करण्यात येणार आहे. नेत्र तपासणीसाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यासाठी सकाळी ९.३० वाजल्यापासून दुपारी ४.०० वाजेपर्यंत ऋणांची नेत्र तपासणी करण्यात आली. नेत्र तपासणी प्रसंगी अशोक मांगदारे, नारायण वायाळ, दिपक पवार, आण्णासाहेब काळे, बाबासाहेब गावडे, सचिन पवार, उमेश काळे, श्रीमती पारुबाई खैरे, आनंद पवार, संजय गावडे, विजय शिंदे, लहुराव खटके तर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. समाधान नागरे, डॉ. दीपक खमीतकर, डॉ. भगवान गिते, एस जी. निकम, एस एस उगले, ए. बी. जरारे, एस के जाधव, राजेंद्र गायके, ही.ए.गवळी, एस.एन.जोशी, सिद्धार्थ मगरे आदी उपस्थित होते.

## बॉल बॅडमिंटन स्पर्धेत ज्ञानसागर महाविद्यालय शिपोरा अंभोराची बाजी

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय , महाराष्ट्र राज्य व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ,जालना यांच्या संयुक्त विद्यमाने,ज्ञानसागर माध्यमिक विद्यालय, सिपोरा (अं.) ता. जाफराबाद येथे जिल्हास्तरीय बॉल बॅडमिंटन व मॉर्डन पेंटॅथलॉन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत जिल्हाभरातून १४ वर्ष ,१७ वर्ष व १९ वर्ष खालील खेळाडू सहभागी झाले होते. बॉल बॅडमिंटन स्पर्धेच्या सर्व गटात ज्ञानसागर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ,राज्य क्रीडा मार्गदर्शक श्री जोगदंडे



सर ,श्री कदम सर क्रीडा शिक्षक श्री एकनाथ सुरूशे सर ,नंदू गायके यांनी परिश्रम घेतले. पंच म्हणून योगेश ताकमोघे ,अमोल अंभोरे यांनी काम पाहिले. यशस्वी खेळाडूंचे मा. केंद्रीय राज्य मंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे,आमदार संतोष पाटील दानवे संस्था अध्यक्ष श्री सुरेश दिवटे सचिव श्री जाधव सर यांनी अभिनंदन केले.

## प्रभारी नायब तहसीलदार भगवानराव बागल यांचा सेवापुर्ती निमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/ प्रतिनिधी**

मंठा तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाचे प्रभारी नायब तहसीलदार भगवान श्रीपतराव बागल यांचा सेवापुर्ती सोहळा सोमवार ता. ३० रोजी तहसील कार्यालयाच्या सभागृहात संपन्न झाला. या सेवापूर्ती व स्वागत समारंभाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार श्रीमती सोनाली जोंधळे यांची उपस्थिती होती. भगवानराव बागल यांनी सन २००५ -२०११ परतुर येथे महसूल विभागात लिपिक म्हणून काम केले, २०१२ ते २०१३ पुरवठा विभाग बदनापूर, सन २०१३ ते २०२१ आठ वर्ष परतुर येथील पुरवठा विभागात अव्वल कारकून म्हणून जबाबदारी पार पडली आणि २०२१ ते २०२४ पुरवठा विभागाचे प्रभारी नायब तहसीलदार म्हणून त्यांनी तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार आणि रेशन कार्डधारक यांच्यात समन्वय ठेवून उत्कृष्ट कार्य केले. कार्यालयात आलेल्या लोकांचे प्रश्न तात्काळ सोडविले. तहसीलदार श्रीमती सोनाली जोंधळे यांनी आपल्या भाषणात प्रभारी पुरवठा अधिकारी भगवानराव बागल यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. यावेळी त्यांचा छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट देऊन स पत्नीक सत्कार केला. या कार्यक्रमाला राज्य मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष पी बी मते, महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र शिंदे, सरचिटणीस अरुण डुकरे पाटील, माजी जिल्हाध्यक्ष व्ही डी मस्के, नायब तहसीलदार संजय शिंदे, एस पी कुलकर्णी, पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार श्री राजपूत, जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेचे कोषाध्यक्ष व्यंकटेश दंडेवाड, जिल्हा पुरवठा कार्यालयातील नंदकुमार क्षीरसागर, श्री जाधव, तलाठी संघटनेचे तालुकाध्यक्ष संजय उफाड, मंडळ अधिकारी गणेश कुलकर्णी, मंगेश देशमुख, रास्त भाव दुकानदार संघटनेचे परतुर तालुकाध्यक्ष अंकुशराव लिपणे, मंठा तालुका अध्यक्ष विठ्ठलराव काळे, सेवानिवृत्त तहसीलदार श्री फुकाटे, तहसील कार्यालयातील कर्मचारी महसूल अव्वल कारकून श्री देशमुख, श्रीमती धुमाळ, श्रीमती सरकटे, श्री काळे, भगवान खालापूरे, सचिन कळणे, श्री इंगळे, श्री आडे, श्री गायकवाड यांच्यासह मंठा आणि पुरवठा विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

## राज्य मातेच्या दर्जाने गाईंची सेवा, संवर्धनास बळ मिळेल!; पांजरपोळ गौशाळेतर्फे शासनाचे आभार

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

पर्यावरणाचा समतोल राखण्यास महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या गाईंना महाराष्ट्र शासनाने राज्यमातेचा दर्जा दिल्यामुळे गाईंची सेवा, संवर्धन करण्यास अधिक बळ मिळेल. असा विश्वास पांजरापोळ गोशाळेच्या विश्वस्तांनी मंगळवारी ( ता. ०१)व्यक्त केला.

कृषी पशुसंवर्धन ,दुग्ध व्यवसाय, विकास व मत्स्य व्यवसाय विभागाचे उपसचिव नि.




भा. मराळे यांनी देशी गाईंना राज्यमाता -गोमाता घोषित करण्या बाबतचा शासन निर्णय सोमवारी ( ता. ३०) जारी केला. या ऐतिहासिक निर्णयाचे पांजरापोळ गोशाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले. गाईंना राज्य मातेचा दर्जा मिळावा ही गोपालकांची अनेक वर्षांपासून मागणी होती यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा सुरू होता.अखेर काल राज्य शासनाने या बाबत घोषणा केली.

क्रांतिकारक निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस ,अजित दादा पवार ,कृषिमंत्री धनंजय मुंढे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, आ. संतोष पाटील दानवे, आ.नारायण कुचे ,आ.बबनराव लोणीकर, गौसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, भास्करराव पाटील दानवे, यांचे पांजरापोळ गोशाळेचे अध्यक्ष उद्योजक घनश्यामदास गोयल, उपाध्यक्ष ओमप्रकाश मंत्री, सचिव कैलाश बियाणी, कोषाध्यक्ष विजयकुमार कामड, माजी अध्यक्ष बनारसीदास जिंदल, विश्वस्त संजय लाहोटी, कैलास गोरंट्याल ,महेंद्र कुमार भक्कड ,सुभाषचंद्र देविदान, विजयकुमार राठी,अनिल सोनी, यांनी आभार मानले. तसेच या निर्णयामुळे गौमातेच्या तस्करीस आळा बसेल, असा विश्वास गौसेवकांनी व्यक्त केला.

## अग्रलेख...

# स्वकुळ तारक सुता...

लोकसभा निवडणुकीच्या काळात ज्या ज्या राजकीय पक्षांना आपल्या भविष्याच्या भीतीने पछाडले होते, त्या पक्षांमधील अस्वस्थता पुन्हा एकदा नव्याने बळावू लागली आहे. नरेंद्र मोदी यांची १० वर्षांची सत्ता संपुष्टात येणार आणि देशात इंडिया नावाच्या कडबोळ्याचे सरकार येणार, अशी स्वप्ने पाहत विरोधकांतील जे चाणक्य नव्या राजकीय मांडणीची भाकिते वर्तवत होते, त्यामध्ये शरद पवार यांचे नाव पहिल्या क्रमांकावर होते. पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील मर्यादित ताकदीचे नेते असल्याचे वारंवार सिद्ध झाले असले, तरी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीच्या बळावर राष्ट्रीय पातळीवर बिगरभाजपा पक्षांच्या राजकारणात त्यांनी आपले बस्तान व्यवस्थित बसविलेले असल्याने त्यांनी वर्तविलेली भाकिते सहसा फोल ठरत नाहीत, अशी अंधश्रद्धा असलेल्या राजकीय निरीक्षकांनी तेव्हा त्यांच्या भाकितावर भाष्य करणारे माध्यमांचे रकानेही भरले होते. पण लोकसभा निवडणुकीच्या निकालांनी सर्वांनाच धक्का दिला आणि पवारांचे भाकीतच चुकल्यामुळे त्यांच्या भाकितावर भाष्य करणाऱ्यांचे आडाखेही चुकत गेले. असे असले तरी विरोधकांच्या मागे लागलेले प्रतिकूल राजकीय परिस्थितीचे शुक्लकाष्ठ अजूनही सरलेले नाही; भाकिताचे भय मात्र सर्वांच्या मानगुटीवर बसलेले असावे, असेच दिसत आहे. खुद्द पवारांचेच भाकीत सातत्याने चुकत गेल्याने, राजकीय भविष्याचे भय अधिक गडद झालेल्या नेत्यांपैकी एक म्हणून आता उद्धव ठाकरे स्वतःच पुढे येत असल्याचे दिसू लागले आहे. आपला पक्ष पुरता संपविण्यासाठी राजकारणात सर्वत्र कारस्थाने सुरू आहेत आणि असे झालेच तर आपण त्याचा मुकाबला करू शकतो किंवा नाही, याची त्यांना खात्री राहिलेली दिसत नाही. महाविकास आघाडीचा प्रयोग करून पाच वर्षांपूर्वी शरद पवार यांनी अनैतिक मार्गाने यशस्वी केलेला सत्तेचा प्रयोग म्हणजे ठाकरे यांच्या पक्षास राजकारणाच्या पटलावर केंद्रस्थानी आणण्याची सर्वात मोठी खेळी होती, असे त्यावेळी ज्यांना वाटले होते, त्यांचा आज पाच वर्षांनंतर पूर्ण भ्रमनिरास झाला आहे. उद्धव ठाकरे यांनाही आता आपली चूक उमगू लागली आहे. उद्धव ठाकरे हे बंद दरवाजाआडचे राजकारण करत नाहीत, असे ते स्वतःच सांगतात. काही महिन्यांपूर्वी शरद पवार यांच्या भेटीसाठी ते गेले असता, पवार यांनी त्यांना बंद दरवाजाआड सुरू असलेल्या बैठकीत सामील करून न घेता बाहेर थांबण्याची सूचना केली व ठाकरे यांनीही बाहेर थांबणेच पसंत केले, हे समाजमाध्यमांवरून फैलावलेल्या एका चित्रफितीतून महाराष्ट्रास उमगले होते. त्यामुळे आता जेव्हा आपला पक्ष संपविण्यासाठी भाजपासारखे पक्ष सरसावल्याची जाहीर भीती त्यांच्या मनात बळावत चालली आहे. भाजपाचे नेते आपला पक्ष संपविणार आहेत, असा आक्रमक कांगावा त्यांनी सुरू केला आहे. वस्तुतः शिवसेनेत पडलेल्या फुटीची नेमकी कारणे लपून राहिलेली नाहीत. शिवसेनेतील पहिल्या ऐतिहासिक फुटीपासून सुरू झालेल्या पक्ष संपण्याच्या प्रक्रियेचे नेमके मूळ उद्धव ठाकरे हे स्वतःच होते, हे इतिहासातून उघड झाले आहे. त्यांच्या नेतृत्वाशी जुळवून घेणे शक्य नसल्यामुळेच व त्यांची नेतृत्वशैली मान्य नसल्यामुळेच छगन भुजबळ, राज ठाकरे, नारायण राणे, गणेश नाईक यांच्यापासून ते एकनाथ शिंदे यांच्यासह सारे नेते पक्षातून बाहेर पडले होते, हे स्पष्ट असताना पक्ष संपविण्याच्या कारस्थानाचे खापर भाजपावर फोडत जनतेची सहानुभूती मिळविण्याचा त्यांचा केविलवाणा राजकीय प्रयत्न सुरू आहे आणि शरद पवारांसारख्या नेत्याने पक्ष वाचविण्यासाठी आपल्याला मदत करावी, अशा छुप्या अपेक्षेची किनारही आहे. पण पवार हे ठाकरे यांचा पक्ष वाचविण्यासाठी राजकारण करीत नसून आपल्या पक्षाला राज्याच्या सत्तेच्या केंद्रस्थानी राखण्याकरिता प्रयत्न करीत आहेत, हे स्पष्ट झाल्यामुळे ठाकरे अस्वस्थ आहेत.

रविवारी नागपूरमधील एका कार्यक्रमात त्यांनी धारण केलेले बेगडी उग्ररूप हा स्वतःच्या आणि गेल्या अनेक दशकांपासून सुरू असलेल्या गळतीनंतर उरलेल्या पक्षास वाचविण्याचा आक्रमक बचाव होता, हे उघड आहे. ही सत्तेची लढाई नाही असे उद्धव ठाकरे या सभेत म्हणाले, तेव्हा त्यांच्या भाषणाचा संपूर्ण रोख हा स्वपक्षाच्या बचावाचाच होता, हेही स्पष्ट झाले. आपला पक्ष संपविण्यास निघालेल्यांना शरद पवारांचा पक्षदेखील संपवायचा आहे, असा आरोप करून पक्ष बचावाच्या मोहिमेत पवार यांनाही सहभागी करून घेण्याचा त्यांचा हेतू लपून राहिलेला नाही. शरद पवार हे राजकीय चाणक्य असल्याची अनेकांची भावना आहे, तर आपण धूर्त राजकारणी आहोत, असे उद्धव ठाकरे मानतात. तसे त्यांनी बोलूनही दाखविले आहे. त्यामुळे पक्ष बचावाच्या या मोहिमेत पवारांची चाणक्य नीती वापरली जाणार की ठाकरेंचा धूर्तपणा कामी येणार, याविषयीची एक अनाम स्पर्धा त्यांनी स्वतःच उभी केलेली दिसते. काहीही झाले तरी पक्ष वाचविणे हेच त्यांच्यासमोरील आव्हान आहे, ही बाब उघड आहे. त्याचे आणखीही एक कारण आहे. लोकसभा निवडणुकीनंतर लहान-मोठे पक्ष एक तर काँग्रेसमध्ये विलीन होतील किंवा अशा पक्षांना काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र येणे भाग पडेल, असे एक भाकीत शरद पवार यांनी लोकसभा निवडणुकीच्या निकालांआधी वर्तविले होते. ते तंतोतंत खरे ठरले नसले, तरी सध्याची विरोधकांची राजकीय परिस्थिती पाहता, अशी वेळ भविष्यात केव्हाही ओढवू शकते, याचीही जाणीव या पक्षांच्या नेत्यांना आहे आणि त्यामध्ये उद्धव ठाकरेंचा समावेश आहे. आगामी विधानसभा निवडणुका स्वबळावर लढविण्याची कोणत्याच विरोधी पक्षाची मानसिकता नाही किंवा स्वबळावरील विजयाचा या पक्षांचा इतिहासदेखील नाही. महाराष्ट्राची जनता महाविकास आघाडीतील कोणाही एका पक्षास बहुमताचा कौल देईल, अशी शक्यता नसल्याने, मतभेद असतानाही एकत्र राहणे ही अपरिहार्यता उद्धव ठाकरे यांच्यासह सर्वच नेते जाणतात. महाविकास आघाडीचा भावी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून उद्धव ठाकरे यांचे नाव पुढे रेटण्याचा त्यांच्या पाठीराख्यांचा प्रयत्न आणि त्यासाठी खुद्द ठाकरे यांनी केलेली मोर्चेबांधणी पुरती फसल्यानंतर आता सत्तेच्या गणितात महाविकास आघाडीमध्ये त्यांच्या पक्षाचे महत्त्व जेमतेम संख्याबळाच्या जुळणीपुरतेच उरले आहे, याचीही त्यांना जाणीव असावी. त्यामुळेच पक्ष बचाव मोहिमेस पुन्हा नव्याने जोर देऊन, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस व नाना पटोलेंच्या काँग्रेससह आघाडीतील अन्य पक्षांना आपल्या मोहिमेत जोडून घेण्याची धूर्त राजकीय खेळी त्यांनी आघाडीसमोर उभी केली आहे. भाजपा ही त्यांची खरी भीती नाही तर शरद पवार हेच त्यांना स्वपक्षाच्या अस्तित्वापुढील आव्हान वाटते, ही बाब लपून राहिलेली नाही. महाविकास आघाडीसोबत असतानाही पवार यांच्यासोबत सावलीसारखे राहण्याच्या त्यांच्या राजकारणाचा अन्वयार्थ तोच असावा. कारण आघाडीत नसताना त्यांनी याच शरद पवार यांच्यावर टीकास्त्रही सोडले होते. पवार यांच्या राजकारणावर सर्वाधिक तीव्रपणे टीका करण्यात आघाडीपूर्व काळात उद्धव ठाकरे हेच अग्रेसर होते आणि पवार यांच्या राजकारणातील विश्वासार्हतेविषयी सातत्याने शंका घेणारेही तेच होते. पवार यांनी आपल्या आत्मकथनपर पुस्तकातून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर उमटविलेली काही प्रश्नचिन्हे अजूनही ठाकरे यांच्या नजरेसमोरून दूर झालेली नाहीत. तरीही पवार यांच्यासोबत राहणे ही अपरिहार्यता ओळखूनच, तुम्ही आम्हाला संपू द्याल का, असा सवाल करून त्यांनी पवार यांचे पाठीराखेपण कायम करून घेतले असावे.

ठाकरे यांच्या राजकारणाचे एक वेगळेपण आहे. निवडणुकांच्या काळातही ते राज्याच्या किंवा देशाच्या हिताची आपल्या पक्षाची नेमकी भूमिका काय ते स्पष्ट करत नाहीत. त्याऐवजी प्रतिपक्षावर टीका करणे, हिंमत असेल तर समोर लढा अशी आव्हाने देणे ही त्यांची राजनीती आहे. जनतेला आता अशा राजनीतीमध्ये रस राहिलेला नाही आणि गेल्या १० वर्षांपासून, म्हणजे केंद्रात मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून देशात सुरू असलेल्या विकासाच्या राजनीतीची जनता साक्षीदार झाली आहे. त्यामुळे ठाकरे यांचे पक्ष बचाव रुदन त्यांना किती तारणार आणि आघाडीतील अन्य पक्ष स्वबळ वाढविण्याआधी ठाकरेंच्या पक्षास बळ देण्याकरिता किती पुढे येणार, हा प्रश्न नक्कीच कायम राहणार आहे.

## आंतरराष्ट्रीय

# मोदींचा ब्रुनेई आणि सिंगापूर दौरा

**वसंत गणेश काणे**

सुमारे सहा हजार चौ.कि.मी. क्षेत्रफळ (म्हणजे सिक्कीमपेक्षा लहान आणि गोव्यापेक्षा मोठा) आणि चार लाख लोकसंख्या असलेला ब्रुनेई दारूसलाम (पूर्ण नाव) हा एकेकाळी बौद्ध व हिंदू धर्मीयांचा देश होता. या छोट्याशा देशाचे शेजारी कंबोडिया, इंडोनेशिया, मलेशिया आणि सिंगापूर हे देश आहेत. सिरी बेगावन हे बंदराचे शहर ब्रुनेईची राजधानी असून या देशात मलय भाषा बोलली जाते. ब्रुनेई हे 'वरुण' या संस्कृत नावाचे रूपांतरित स्वरूप आहे. १९५९ मध्ये ब्रुनेईने आपल्या राज्यघटनेत इस्लामचा अधिकृत धर्म म्हणून स्वीकार केला आहे. आज या देशात ८२ टक्के मुस्लिम आहेत. फक्त ६ टक्के बौद्ध उरले आहेत. खनिज तेल आणि नैसर्गिक इंधन वायू यांच्या भरवशावर हा देश कमालीचा श्रीमंत झाला होता. ना शिक्षणासाठी खर्च, ना उपचारांसाठी वैद्यकीय खर्च, ना आयकर! अर्थात हेअर कटिंगचा खर्च मात्र होता, १६ लाख रुपये! पण केवळ खनिज तेलापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या या देशाच्या वैभवाला आता उतरती कळा लागली आहे.

३ आणि ४ सप्टेंबर २०२४ ला मोदी यांनी ब्रुनेईचा दौरा पूर्ण केला आणि नंतर ते सिंगापूरला गेले. ब्रुनेईला भेट देणारे नरेंद्र मोदी हे पहिले भारतीय पंतप्रधान ठरले आहेत. या देशांमधील हिंदी महासागरातील भागीदारी आणि व्यापार वाढवण्यावर या दोघांत भेटीदरम्यान चर्चा झाली. चर्चेत संरक्षण आणि अवकाश (स्पेस) क्षेत्रात परस्परांना सहकार्य करण्याच्या विषयावर चर्चा झाली. टेलिमेट्री (दूर अंतरावरून प्रक्षेपित होणाऱ्या संदेशांचा अभ्यास) सॅटेलाईटचा व प्रक्षेपण केलेल्या उपग्रहाचा मागोवा घेणे याबाबत तर निश्चित कार्यपद्धती आखण्यासंदर्भातही निर्णय घेतले गेले. ब्रुनेईकडून याबाबत मिळत असलेल्या सहकार्यासंबंधी मोदींनी समाधान व्यक्त केले आहे. मोदींनी ब्रुनेईत राहात असलेल्या भारतीय वंशाच्या लोकांची नेहमीच्या रीतीप्रमाणे भेट घेतली. ब्रुनेईत राहणारे भारतीय लोक या दोन्ही देशांना जोडणाऱ्या सेतूची भूमिका पार पाडत असल्याचे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

१९२० नंतर कच्च्या तेलाच्या शोधात भारतीय लोक ब्रुनेईत पोहोचले होते. जवळपास चार लाख लोकसंख्या असलेल्या या देशात आज १४ हजार भारतीय राहतात. ब्रुनेईतील शिक्षण आणि वैद्यकीय क्षेत्रातील भारतीयांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. भारत आणि ब्रुनेईमध्ये जवळपास २५ कोटी डॉलरचा व्यापार खनिज तेलाच्या बाबतीत होतो. १९६३ मध्ये ब्रुनेईने फेडरेशन ऑफ मलेशियाचा भाग म्हणून न राहण्याचा निर्णय घेतला आणि तो मलेशियापासून वेगळा झाला. २०१४ मध्ये शरिया कायदा लागू होणारा ब्रुनेई हा आशिया खंडातील पहिला देश ठरला आहे. स्वतंत्र झाल्यापासूनच ब्रुनेईत विरोधी पक्षांना परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे तिथे लोकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही, असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. त्यामुळे प्रसारमाध्यमे मोकळेपणाने बातम्या छापू शकत नाहीत किंवा वार्तांकन करू शकत नाहीत. कच्च्या तेलाच्या जोरावर ब्रुनेई हा देश संपन्न झाला होता. मात्र, आता परिस्थिती बदलते आहे. खनिज तेलाच्या व्यापारात नवीन स्पर्धक उभे राहिले आहेत. त्यामुळे तेलाच्या किमती घसरल्या. मागील काही वर्षांमध्ये ब्रुनेईला तोटा सहन करावा लागतो आहे. देशाची अर्थव्यवस्था सुस्तावली आहे, विकासाचा दर घटला आहे. ब्रुनेई सरकारच्या तोट्यातदेखील वाढ झाली आहे. आज रोजगार ही या देशातील मोठी समस्या आहे.

ब्रुनेई एसियन संघटनेचा सदस्य आहे. एसियनची स्थापना १९६७ साली थायलंडमधील बँकॉक येथे झाली होती. सुरुवातीला १) थायलंड, २) इंडोनेशिया, ३) मलेशिया, ४) फिलिपाईन्स आणि ५) सिंगापूर हे पाचच सदस्य होते. सहावा ब्रुनेई १९८४ मध्ये, सातवा व्हिएतनाम १९९५ मध्ये, आठवा लाओस १९९७ मध्ये आणि नववा म्यानमार आणि दहावा कंबोडिया १९९९ मध्ये एसियनमध्ये सामील झाले. आज असे १० देश एसियनचे सदस्य आहेत. मोदींच्या तिसऱ्या कारकीर्दीत आतापर्यंत मोदींनी चार देशांना भेटी दिल्या आहेत. त्यातले ब्रुनेई आणि सिंगापूर एसियनचे सदस्य आहेत. या दोन्ही देशांचे सामरिकदृष्ट्या भारतासाठी खूप महत्त्व आहे. याच काळात व्हिएतनाम आणि मलेशिया यांचे नेतेही भारताला भेट देऊन गेले आहेत. या सर्वांना दक्षिण चिनी समुद्रातील चीनच्या वाढत्या हस्तक्षेपाचा त्रास होतो आहे. चिनी विस्तारवाद आणि दंडेली यामुळे हे आणि असे अन्य देश त्रस्त झाले आहेत. साहजिकच एक मोठा आणि शक्तिशाली देश म्हणून हे देश भारताकडे मोठ्या अपेक्षेने पाहत आहेत. या दृष्टीने विचार करता भारतावर दुहेरी जबाबदारी आली आहे. एक म्हणजे स्वत:च्या हितसंबंधांची जपणूक करणे आणि दुसरे म्हणजे इंडो-पॅसिफिक विभागातील व्यापारी जा-ये सुरक्षित राहील, याकडे लक्ष पुरविणे. ही जबाबदारी मोदींनी उत्तमरीतीने पार पाडली आहे. पण मोदींनी कोणत्याही मुस्लिम देशाला भेट दिली, काही करारमदार केले की, पाकिस्तानचा तीळपापड होत असतो. आता हे देश काश्मीरप्रश्नी आपल्यापासून दूर जाणार या शंकेने पाकिस्तान अस्वस्थ होत असतो.

ही मोदींची ब्रुनेई दारूसलामला पहिलीच भेट होती तर सिंगापूला ही पाचवी भेट होती. या भेटीमागे पूर्वेकडील देशांशी संपर्क वाढवा, हा उद्देश होता. इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील चिनी सरकारचा वाढता उपद्रव हा तर महत्त्वाचा मुद्दा होताच; त्याचबरोबर दुसरा व्यापारविषयक मुद्दाही काही कमी महत्त्वाचा नव्हता म्हणून व्यापार, संरक्षण, अवकाश हे या दोघांनी निवडलेले विषय महत्त्वाचे ठरतात.

सिंगापूरमध्ये सेमीकंडक्टर, आरोग्य आणि कौशल्य विकास हे अतिशय महत्त्वाचे मुद्दे चर्चेत हाताळले गेले, हे विशेष म्हटले पाहिजे. म्हणून भारत आणि सिंगापूर यातील सेमीकंडक्टर इको सिस्टिम पार्टनरशिप, विशेष उपयोगाची आहे. आता एकूण एक प्रकारची चिप तयार करण्याची क्षमता भारतात निर्माण व्हावी या प्रयत्नाला बळ मिळेल. कोविड काळात चीनच्या कावेबाजपणामुळे जगभर चिपचा तुटवडा निर्माण झाला होता. शिवाय जगातील मोजक्या देशातच चिप निर्मिती तंत्रज्ञान पूर्णत्वापर्यंत विकास पावले आहे. सिंगापूरचे व्यापारजगत भारतात लवकरच एकूण पाच लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याच्या विचारात आहे.दहशतवादाचे कोणत्याही निमित्ताने समर्थन करता येणार नाही, अशी अतिस्पष्ट भूमिका सिंगापूरचे नव्याने निवडून आलेले पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांनी जाहीरपणे मांडली आहे. शांतता आणि स्थैर्य हवे असणाऱ्यांनी ही भूमिका संयुक्त राष्ट्र संघाच्या नेतृत्वात घेतली पाहिजे, यावर भारत आणि सिंगापूर यांचे एकमत झाले. यासाठी या नेत्यांनी कॉम्प्रिहेन्सिव्ह कनव्हेन्शन ऑन इंटरनॅशनल टेररिझम आयोजित करून उपाययोजना करावी, असे सुचविले आहे. भारत आणि सिंगापूर हे देश संयुक्त राष्ट्र संघटना, जागतिक आरोग्य संघटना आणि इंडियन ओशन रिम असोसिएशन यात काम करीत असताना सहकार्य आणि शाश्वत विकास यावर भर देतील, असा निश्चय या देशांनी व्यक्त केला आहे. यासाठी ते असोसिएशनचे २३ सदस्य आणि ९ डायलॉग पार्टनर्स यांच्यासोबत एकजुटीने प्रयत्न करतील, असेही ठरले आहे.

९४२२८०४४३०

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# फडणवीसांचा झंझावात अन् विरोधकांची हतबलता

राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला असून, युती सरकारच्या धडाकेबाज निर्णयाने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. आगामी काळात देवेंद्र फडणवीसांना कसे थोपवायचे, या एका प्रश्नाने विरोधकांची झोप उडाली आहे. अभद्र आघाडी आणि युती या दोघांमधील फरक जनतेला लक्षात आल्याने त्यांची पंचाईत झाली आहे. देवेंद्र फडणवीस नावाचा हा झंझावात राज्यामध्ये आपल्याला एवढा भारी पडेल, याची विरोधकांनी झोपेतही कल्पना केली नसेल. प्रत्यक्षात ज्यावेळी या झंझावाताशी विरोधकांचा सामना झाला त्यावेळी अराजकतेचे त्यांचे सर्व मनसुबे धुळीस मिळाले. त्यानंतर राज्याला अस्थिर करण्याचा विरोधकांचा डाव युती सरकारने त्यांच्यावरच परतवून देवेंद्र फडणवीसांनी धमाल केली. उद्धव ठाकरे यांनी भाजपाच्या पाठीत खंजीर खुपसून अडीच वर्षे राज्याची धुरा आपल्या हाती घेतली होती. मात्र, औटघटकेचे हे फेसबुक लाईव्ह सरकार आपला कार्यकाळ पूर्ण करू शकले नाही. याउलट राज्यामध्ये अडीच वर्षांनंतर सत्तांतर झाल्यावर युती शासनाने लावलेला कामाचा धडाका डोळे दीपविणारा आहे. राज्यामधील जी कामे पाच वर्षांच्या कार्यकाळात पूर्ण होऊ शकली नसती, ती कामे देवेंद्र फडणवीस यांनी अवघ्या अडीच वर्षांत पूर्ण करून दाखविली. दिलेल्या वचनाची पूर्तता आणि आपल्या धडाकेबाज कामगिरीमुळे राज्यामध्ये आजमितीस तरी देवेंद्र फडणवीस यांच्या उंचीचा दुसरा नेता राज्यामध्ये नाही, ही वस्तुस्थिती आहे. राज्यामधील रस्ते, महामार्ग, उड्डाणपूल, मेट्रो, बोगदे, वाढवण बंदर, नवे विमानतळ अशी कितीतरी दळणवळणाची साधने राज्यामध्ये देवेंद्र फडणवीसांच्या दूरदर्शी आणि जलद निर्णय क्षमतेमुळे महाराष्ट्रामध्ये तयार होत आहे. भारतामधील एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ५३ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्र राज्याने खेचून आणली. देशामधील सर्व राज्यांतील एकूण गुंतवणकीपेक्षाही ही गुंतवणूक ३ टक्के अधिक आहे. राज्यातील ग्रामीण भाग प्रमुख केंद्राशी जोडणे, नवीन नगरांची निर्मिती, बेरोजगारीशी लढण्यासाठी विविध प्रकारच्या उत्पन्नाची साधने निर्माण करणे, गावागावांमध्ये आधुनिक सेवा, रोजगार निर्मितीला प्रथम प्राधान्य असे अनेक लोकाभिमुख कार्यक्रम फडणवीस यांनी पूर्ण करून विकासाची परिभाषा राज्यामध्ये प्रत्यक्षात उतरविली आहे. यासाठी लागणाऱ्या वीज आणि पाणी या सुविधा पुरविण्याचा आटोकाट प्रयत्न युती सरकार करीत आहे. शेतीसाठी लागणारा सर्व वीजपुरवठा महाराष्ट्रामध्ये पूर्णपणे सौर ऊर्जेवर केला जाणार आहे. त्यामुळे विजेचा अनुशेष पूर्णपणे भरून निघणार असून, त्यानंतर कायमस्वरूपी प्रचलित किमतीपेक्षाही कमी दराने विक्रीयोग्य वीज उपलब्ध होणार आहे. भविष्यामध्ये ही वीज उद्योगांना पुरविली जाणार आहे. या एकमेव कारणाने भविष्यात अनेक उद्योग महाराष्ट्रात येतील, अशी अपेक्षा आहे. गेल्या अडीच वर्षांतच राज्यात हजारो नव्या रोजगारांच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. जवळपास पाच लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आली आहे. युती सरकारची ही घोडदौड डोळे दीपविणारी असून, अभद्र आघाडी त्यामध्ये खोडा घालण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहे. २०१९ मध्ये राज्यात भाजपा बहुमतात असतानाही भाजपाला सत्तेबाहेर ठेवण्याचा डाव शरद पवारांनी आखला आणि उद्धव ठाकरे त्यामध्ये अलगद अडकले. त्यामुळे अखेरच्या घटका मोजणाऱ्या काँग्रेसलाही जीवदान मिळाले, हा इतिहास आहे. त्यांच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळामध्ये महाराष्ट्राची अस्मिता रसातळाला गेली. युवक बेरोजगार राहू लागले, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचा कोणीही वाली राहिला नाही. राज्यातील जनता आघाडी सरकारला कंटाळली होती. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने राज्यामध्ये युती सरकार पुन्हा एकदा आरूढ झाले. नेमकी हीच सल विरोधकांना अजूनही बोचत आहे. एकटा देवेंद्र काय करू शकतो, अशा फुशारक्या मारणारे आता मात्र या वादळासमोर आपल्या अस्तित्वाच्या लढाईसाठी लढत आहेत.



९८८१७१७८५६

## इतस्तत:

# स्त्री शक्तीच्या सामर्थ्याची कंपन्यांना मोहिनी

**दत्तात्रेय आंबुलकर**

आजकाल महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करतात. स्त्री शक्तीच्या सामर्थ्याचे पूजन करण्याचा सण म्हणजेच नवरात्र अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे. स्त्रियांना त्यांच्यातील सामर्थ्याची जाणीव झाली असून, त्या आता बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यवस्थापनाची धुराही समर्थपणे सांभाळत आहेत. कंपनीतील प्रत्येक विभागात आज महिलांचा समावेश अधिक करण्यासाठी कंपन्या प्रयत्नशील आहेत.

कंपनी व्यवस्थापन क्षेत्रात महिलांची अधिक प्रमाणात निवड करून आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये महिला कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याचे आव्हान आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वच कंपनी व्यवस्थापनांपुढे उभे आहे. या पृष्ठभूमीवर भारतातील कंपन्यांनी गेल्या काही वर्षांत विशेष प्रयत्न केले आहेत. या संदर्भात नव्यानेच प्रकाशित झालेल्या संशोधन अभ्यासानुसार, भारतीय व्यवस्थापन कंपन्यांपैकी सुमारे ६३ टक्के कंपन्या कर्मचाऱ्यांची निवड करताना, महिला उमेदवारांना धोरणात्मक स्वरूपात प्राधान्य देण्यावर भर देतात. सुमारे पाच वर्षांपूर्वी हे प्रमाण ४१ टक्क्यांवर होते.

राजधानी दिल्लीतील वुईएस या कर्मचाऱ्यांचा कौशल्य विकास, प्रशिक्षण-मार्गदर्शन क्षेत्रात विशेष स्वरूपात काम करणाऱ्या व्यवस्थापन सल्लागार कंपनीने केलेल्या अभ्यासावर आधारित अहवाल प्रकाशित झाला आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत देशातील उद्योग-व्यवसायांतील अधिकांश म्हणजे, ६३ टक्के कंपन्या, आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये महिला कर्मचाऱ्यांची संख्या वाढण्यासाठी व त्यांनी अधिक जबाबदारीच्या पदांवर काम करण्याची संधी देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. याच संशोधनात सहभागी झालेल्या ८६ टक्के कंपन्यांनी त्यांच्या भविष्यकालीन गरजा लक्षात घेता, महिला-कर्मचाऱ्यांमध्ये व्यवस्थापकीय गुण व नेतृत्व विकासासाठी विशेष प्रशिक्षणासारखे प्रयत्न सुरू केले आहेत, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

आज एकीकडे प्रगत तंत्रज्ञान-संशोधन व प्रक्रियेचा अवलंब करण्यावर कंपन्यांचा भर असतानाच नव्या बदल प्रक्रियेमध्ये महिला कर्मचारी व व्यवस्थापकांना अधिकाधिक प्रमाणात सामावून घेण्यावर कंपन्यांचा भर दिसून येतो. या क्षेत्रांत महिलाही पुरुषांच्या बरोबरीने पुढाकार घेत असून, उत्पादन क्षेत्रापासून अनुसंशोधन क्षेत्रापर्यंत महिला उमेदवार सहज उपलब्ध होतात. ही बाब व्यवस्थापक आणि व्यवस्थापन क्षेत्रात सकारात्मक परिणामांसह दिसून येते.

याचाच परिणाम म्हणून प्रमुख कंपन्यांच्या मुख्याधिकाऱ्यांसाठी महिला कर्मचाऱ्यांच्या निवडीच्या संदर्भात मार्गदर्शक तत्त्व प्रसारित-प्रचारित करण्यात येतात. सर्वेक्षणात नमूद केल्याप्रमाणे महिला कर्मचाऱ्यांची निवड आणि विकास या मुद्यावर कंपनी स्तरांवर व कंपनी अंतर्गत अनुभवांवर आधारित मार्गदर्शनपर सत्रांचे आयोजन करण्यात येते. अशा सत्रांचासुद्धा सकारात्मक परिणाम दिसून येतो आहे, असे मत वुईएसच्या सहसंस्थापक अनुरंजिता कुमार यांनी व्यक्त केले आहे.

सर्वेक्षणात नमूद केल्यानुसार, आज व्यवस्थापन पद्धती स्वरूपात महिला कर्मचाऱ्यांच्या समावेशकतेचा स्वीकार करण्यात आला आहे. सर्वेक्षणाला प्रतिसाद देणाऱ्या सुमारे ५१ टक्के कंपनी-व्यवस्थापनांनी, आपल्या व्यवस्थापन स्तरावरील एक प्रमुख व्यावसायिक उद्दिष्ट म्हणून कर्मचाऱ्यांमध्ये विविध स्तरांवर महिलांच्या संख्यावाढीला प्रोत्साहन देणे, कर्मचारी निवडीच्या संदर्भात स्त्री-पुरुष उमेदवारांमध्ये भेदभाव न करणे, कामाच्या ठिकाणी समावेशकता या मुद्यांचा समावेश केला आहे. या नव्या वैचारिक कार्यशैलीचा कंपनीच्या सर्व स्तरांवर प्रसार-प्रचार करण्यासाठी, अधिकांश कंपन्या या व्यवस्थापक व व्यवस्थापन स्तरावर विशेष संवादसत्र व प्रशिक्षणाचे आयोजन करीत आहेत.

त्याचसोबत कंपनी अंतर्गत महिला कर्मचाऱ्यांनी अधिक मोठी, अधिकार व जबाबदारीची कामे करण्यासाठी, प्रशिक्षित व अनुभवी महिला कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिले जात आहे. या विशेष प्रशिक्षण सत्रांमध्ये व्यवस्थापन शैली, व्यवसायवृद्धी, प्रभावशाली संवाद, निर्णयक्षमता, नेतृत्व विकास, परस्पर संबंध इत्यादींचा समावेश केला जातो. या प्रशिक्षणाचा महिला कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी उपयोग होतो, असा अनुभव आहे. एकीकडे नव्याने कर्मचाऱ्यांची निवड करताना, महिला उमेदवारांचा त्यांच्या कौशल्य व गुणवत्ता आणि योग्यतेच्या आधारेही विचार केला जातो. हे करत असतानाच आज वाढत्या संख्येत कंपनी-व्यवस्थापनांद्वारा महिला कर्मचाऱ्यांच्या संदर्भात विविधता, समानता व समावेशकता या व्यवस्थापन त्रिसूत्रीचा अवलंब केला जात आहे. या प्रयत्नांना अधिक गतिमान करण्यासाठी सुमारे पाच वर्षांपूर्वी ३४ टक्के कंपन्या प्रयत्नशील होत्या; आज हे प्रमाण सुमारे ५१ टक्क्यांवर गेले आहे. यावरून या विषयातील व्यवस्थापनांद्वारा घेतलेले गांभीर्य सहजपणे लक्षात येते.


महिला कर्मचाऱ्यांच्या संदर्भात प्रामुख्याने नमूद करण्यासारखी बाब म्हणजे, सध्या डीबीएस बँक अंतर्गत जागतिक स्तरावर महिला कर्मचाऱ्यांची टक्केवारी ५० असून, त्यापैकी उच्च व्यवस्थापन श्रेणीतील महिला व्यवस्थापकांचे प्रमाण सुमारे ४० टक्के आहे हे विशेष. बँकेच्या व्यवस्थापनाच्या निर्णयानुसार, भारतात सध्या डीबीएस बँकेत महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण सुमारे ३० टक्के असून आगामी तीन वर्षांत महिलांची टक्केवारी ३५ वर नेण्यासाठी योजनाबद्ध प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांच्या पूर्ततेसाठी बँकेतर्फे एका उच्चस्तरीय कार्यकारी समितीची स्थापना केली असून, या उच्चस्तरीय समितीतर्फे यासंदर्भात विशिष्ट कालावधीनंतर आढावा घेतला जातो. बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मानव-संसाधन विभाग प्रमुख किशोर पोदुरी यांच्यानुसार, त्यांच्या या प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम बँकेच्या व्यवस्थापनापासून व्यवसायापर्यंत सर्वदूर दिसू लागले आहेत.

अशाच प्रकारचे प्रयत्न आणि उपक्रम डीसीएम-श्रीराम उद्योग समूहांतर्गत केले जात आहेत. कंपनीने नव्या कर्मचाऱ्यांची निवड करताना विशिष्ट धोरणात्मक निर्णय घेत नव्या-जुन्या महिला कर्मचाऱ्यांचा प्रशिक्षणाद्वारे विकास करण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेतले आहेत. या संदर्भात आपला अनुभव नमूद करताना डीसीएम-श्रीरामचे व्यवस्थापकीय संचालक संदीप गिरोत्रा यांनी म्हटले आहे की, महिलांच्या संदर्भातील धोरणांची निश्चिती करण्यापासून त्याच्या अंमलबजावणीच्या कामापर्यंतची जबाबदारी, उच्च व्यवस्थापनावर सुरुवातीपासूनच ठेवण्यात आली आहे. त्याचा परिणाम अल्पावधीत व स्पष्टपणे दिसून येत आहे. याबाबत आपापला व्यवसाय, त्याचे स्वरूप व गरजांच्या प्राधान्यांसह प्रयत्न केले जात आहेत. यातून कर्मचाऱ्यांचे प्रमाण व त्यांच्या कामकाजाचा समतोल राखण्यात या कंपन्यांना यश येत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## नवरात्री : स्त्री शक्तीचा जागर

३ ऑक्टोबरपासून नवरात्रीला सुरुवात होत आहे. त्यानिमित्ताने समाज माध्यमातून नऊ दिवसांच्या नऊ रंगांचे संदेश फिरायला सुरुवात होईल; पण कोणाच्याही मनात असा विचार कसा येत नाही की, या सर्व प्रकाराला सुरुवात होऊन तर केवळ सात-आठ वर्षेच झाली. यापूर्वी देवीला प्रसन्न करण्यासाठी उपाय नव्हते का? मुळात नऊ दिवसांच्या नऊ रंगांचे खूळ ही एक व्यावसायिक संकल्पना म्हणून अंमलात आणली गेली आणि त्याला देवीशी पद्धतशीरपणे जोडण्यात आले. त्यामुळे आपण भारतीय स्त्रिया काही विचार न करता या प्रकारात ओढल्या गेलो. अनेक स्त्रिया त्या त्या दिवसानुसार रंग घालताना आढळून येतात. यामुळे झाले काय तर विविध कपडे, साड्या, घागरे, त्याला शोभेसे अलंकार याच्या व्यापाराला चालना मिळाली. काही ठिकाणी तर मुली केवळ रंगाच्या मागे लागल्या. त्यातून तोकडे वस्त्र परिधान करणे, अमली पदार्थांचे सेवन करणे सुरू झाले. अशा वागणुकीमुळे हिंदू धर्माचेच नाव बदनाम होते. त्याचबरोबर नवरात्रीकडे एक इव्हेंट म्हणून पाहण्याचा कल वाढलेला आहे. त्यामध्ये गावाच्या



लांब कोठेतरी एखादे सभागृह किंवा मैदानावर गरबाच्या नावाखाली शुल्क आकारून वाटेल तसे नाच-गाणी वगैरे कार्यक्रम होतात. तेथील वातावरण सात्त्विकतेपेक्षा रज-तमात्मक असते. त्यात हौसे, नवसे आणि इतर धर्मीय त्याचा गैरफायदा घेऊ शकतात. हा भक्तीचा प्रकार नक्कीच होऊ शकत नाही. नवरात्रीचे नऊ दिवस हे स्त्रीमधील देवी तत्त्व जागृत करण्याचे दिवस असतात. नामजपाच्या माध्यमातून देवीची पूजाअर्चा करून आपण देवीची उपासना करू शकतो. नवरात्रीच्या निमित्ताने स्वतःचे रक्षण त्याचबरोबर समाजातील इतर शोषित स्त्रियांचे रक्षण करण्यास मी कटिबद्ध राहीन, अशी प्रतिज्ञा प्रत्येक स्त्रीने केली तर ते खऱ्या अर्थाने देवीपूजन होईल.

**वैशाली महेश परांजपे**/नागपूर

## वाचक पत्रे

### आर्थिक स्थितीवर आधारित आरक्षण

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा जातीवर आधारित आरक्षण प्रस्तावित केले, ते फक्त दहा वर्षांकरिताच होते. नंतर स्वार्थी राजकारणी, गठ्ठा मते मिळवायला, ती मुदत वाढवत गेले, ते आजगायत. राजकारण्यांच्या या स्वार्थी वृत्तीमुळे देशाचे अपरिमित नुकसान झाले आहे. निरनिराळ्या जातींमुळे आपसातील हेवेदावे, भांडणे, रागद्वेष वाढीस लागले व देशाच्या ऐक्यास तडा गेला. आता हे नुकसान भरून निघणे कठीण होऊन बसले आहे. यावर एकच तोडगा आहे. जातीवर आधारित आरक्षण हटवून ते आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गास देणे. याला विरोध सहसा होणार नाही. कारण यामुळे १०० टक्के गरजू लोक कव्हर होतात. तथाकथित मागासवर्गीयांतील सधन लोक यांस विरोध करतील, पण तो विरोध जास्त काळ टिकणार नाही. आर्थिक स्थितीवर आधारित आरक्षण हे १०० टक्के वैज्ञानिक आहे, म्हणून ते योग्य विचारांनी अंमलात आणावे, अशी विनंती आहे.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

### ताणविरहित आयुष्य जगावे

आयुष्य म्हटल्यानंतर प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये कौटुंबिक जबाबदाऱ्या, अपयश, नैराश्य, दुःख, पोटापाण्यासाठी रोजची असणारी धावपळ असतेच. यामुळे मानसिक ताण येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी पण या सर्व गोष्टी बाजूला ठेवून मानसिक समाधान प्रत्येकाने शोधले पाहिजे. छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधून त्याचा परिपूर्ण फायदा घेऊन तो इतरांना पण वाटत आला पाहिजे. तरच तुमचे आयुष्य आरोग्यदायी, निरामय आणि महत्त्वाचे म्हणजे निरोगी होईल. त्याचप्रमाणे ताण हा आधुनिक आयुष्याचा भाग बनत चालला आहे. जीवनशैलीतील बदल, आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढलेला वापर, कामाच्या वाढलेल्या अपेक्षा आणि सामाजिक दबाव यामुळे तणावाचा स्तर अधिकाधिक गंभीर होत चालला आहे. त्यामुळे आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम होत आहे. मानसिकदृष्ट्या तणाव वाढल्यानं चिंता, नैराश्य आणि स्वतःमधील आत्मविश्वास कमी होतो. महत्त्वाचे म्हणजे कोणताही चांगला किंवा योग्य निर्णय घेण्यास कठीण होत जातं. त्याचा आपल्या वैयक्तिक आयुष्यावर आणि व्यावसायिक नातेसंबंधांवरही परिणाम होतो व आपल्या जीवनाचे गणित बिघडत जाते. त्यामुळे आपल्या जीवनामध्ये कितीही ताणतणाव असला, तरी प्रत्येक व्यक्तीने ताणविरहित आयुष्य जगले पाहिजे किंवा त्यांना जगता आले पाहिजे. तरच तुम्ही तुमच्या जीवनामध्ये या तणावाला शत्रू न बनवता मित्र बनविण्याची ताकद निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

**प्रा. सचिन जाधव**/८४२५००३१२७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# मांजरा नदी जलाचे ज्येष्ठ नागरिकांकडून पूजन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१ ऑक्टोबर -**

यावर्षी कळंब तालुका व परिसरात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे यामुळे बीड ,धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवरून वाहणारी मांजरा नदी पात्र भरून वाहत असून मांजरा नदीवरील धनेगाव येथील मांजरा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला आहे.

कळंब शहरासाठी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला असून या तालुक्यातील धरण क्षेत्रातील गावानां शेतीसिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार असल्याने परिसरातील नागरिक समाधान व्यक्त करीत आहे. नदी प्रती आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कळंब शहरातील ज्येष्ठ नागरिकांनी दि.२७ सप्टेंबर रोजी बीड, धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवरील मांजरा नदी पूल येथे नदीजलाचे विधीवत पूजा, आरती करून मांजरा माई पात्रात वस्त्र, श्रीफळ, पुष्प अर्पण करण्यात आले.

या पूजा कार्यक्रमाचे आयोजन ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष हभप. महादेव महाराज अडसूळ, प्रदेश सचिव डी.के. कुलकर्णी, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश टेकाळे, जी.बी. मोराळे, माधवसिंग राजपूत, संदीप कोकाटे, सचिन क्षिरसागर, सुधाकर चौरे, नवनाथ भंडारे, सुरेंद्र शिलवंत यांच्यासह ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने करण्यात आले.



## संक्षिप्त वृत्त...



### रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात हिंदी पंधरवाडा उत्साहात साजरा

**धाराशिव, दि.१ ऑक्टोबर -**

येथील रामकृष्ण परमस महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने १४ सप्टेंबर या हिंदी दिनाच्या निमित्ताने १४ ते २८ सप्टेंबर हा पंधरवडा वेगवेगळे उपक्रमांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. यामध्ये निबंध, वक्तृत्व आणि काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये प्रथम द्वितीय आणि तृतीय आलेल्या मुलांना प्रमुख पाहुणे यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद गायकवाड यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी हिंदी विभाग प्रमुख डॉ .केशव क्षीरसागर प्रा.राणूबाई कोरे, प्रा. स्वाती देडे इत्यादी हिंदी विभागातील प्राध्यापक आदीसह डॉ. मारुती लोंढे, डॉ. दत्तात्रय साखरे, डॉ. वैशाली बोबडे, प्रा. माधव उगिले इत्यादी प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



### वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना विविध शालेय साहित्यांचे वाटप

**मंगरूळ, दि.१ ऑक्टोबर -**

भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष कसई यांच्या वाढदिवसानिमित्त जि.प.प्रा. शाळा कसई येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करून सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा करण्यात आला. इयत्ता पहिली ते सातवी वर्गातील १५५ विद्यार्थ्यांना नवनीतचे इंग्रजी व्याकरण पुस्तकांचे वाटप करण्यात आले. सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना अल्पोपहारही देण्यात आला. यावेळी सुरेश पाटील, तंटामुक्त अध्यक्ष नागनाथ सापते, तानाजी पाटील, मुख्याध्यापक मस्के, सहशिक्षक धरमे, आदटराव, दिवसे इत्यादी उपस्थित होते. सामाजिक व शैक्षणिक उपक्रम घेऊन वाढदिवस साजरा केल्याने शाळेच्या वतीने सर्वच शिक्षकांनी त्यांचा स्वागत सत्कार करून आभार व्यक्त केले.



### जि.प कन्या शाळेला दिली एकावन्न हजार रुपयांची देणगी

**आलुर, दि.१ ऑक्टोबर -**

आलुरचे सुपुत्र तथा पुणे येथील युवा उद्योजक विजयकुमार कलशेट्टी यांनी आपल्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त जि.प कन्या शाळेच्या संपूर्ण इमारतीला स्वखर्चाने रंगरंगोटी करून दिली. ज्या समाजात वाढलो त्या समाजासाठी काहीतरी करावे अशा उदात्त हेतूने प्रेरित होउन कलशेट्टी यांनी शाळेला एकावन्न हजार रुपयेची देणगी दिली या देणगीच्या रकमेतून शाळेने संपूर्ण इमारतीला रंगरंगोटी केली. त्यांनी केलेल्या या दातृत्वाचा सन्मान करण्यासाठी शाळेच्या वतीने दि.२७ सप्टेंबर रोजी त्यांच्या मुलीचा वाढदिवस व दांपत्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हणमंत शंके तर प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्षा ज्योती बोळदे, राजकुमार माने, आनंद ब्याळिकुळ्ळे, ग्रा.पं.सदस्य राजेंद्र बिराडे, नागेश गुंडगे, राजेंद्र मंटगे, मुकिंद क्षिरसागर, कृष्णा कांबळे, शिवशंकर हळणुरे,मल्लिनाथ नारळे, शरणप्पा काशेट्टी, नारायण इंगळे, नवनाथ सुतार, शाळेतील शिक्षकवर्ग, शालेय समितीचे सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रयागबाई जाधव यांचे निधन

**धाराशिव, दि.१ ऑक्टोबर -**



हैद्राबाद मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिक शिवाजी रामचंद्र जाधव यांच्या पत्नी कै. प्रयागबाई शिवाजी जाधव यांचे रविवार दि.२९ सप्टेंबर रात्री १०.३० वा. अल्पशा आजाराने धाराशिव येथे निधन झाले. त्या ७६ वर्षाच्या होत्या. त्यांचा अंत्यविधी सोमवार दि.३० सप्टेंबर रोजी चिलवडी येथे करण्यात आला. त्यांच्या पश्चात पती स्वातंत्र्यसैनिक शिवाजी जाधव, मुलगा नंदकुमार जाधव, एक मुलगी, सुन, नातू व नातसून असा परिवार आहे.

### विनायक कदम यांचे निधन

**जळकोट, दि.१ ऑक्टोबर -**



तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील रहिवासी, सोलापूर येथील राज्य परिवहन महामंडळाचे चालक विनायक कदम (वय ५६) यांचे दि.१ रोजी पहाटे २ वा. सोलापुर येथे निवासस्थानी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जळकोट येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भावजय असा परिवार आहे.

# आई येडेश्वरीच्या नवरात्र महोत्सवास गुरुवारपासून प्रारंभ

## येडेश्वरीदेवीच्या नवरात्र महोत्सवाची तयारी पूर्ण...





शनिवारी (दि.१२) विजयादशमीला सीमोल्लंघन विजयादशमीनिमित्त सायंकाळी पाच वाजता देवीच्या पालखीसह सीमोल्लंघन होईल. गुरुवार (दि.१७) कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी बारवाची पूजा करण्यात येणार आहे. रात्री नऊ वाजता देवीच्या पालखीसह छबीना होणार आहे. नवरात्र महोत्सव काळात दररोज पहाटे तर रात्री साडेआठ वाजता देवीची पंचोपचार पूजा आरती होणार आहे, असे देवस्थान ट्रस्टच्या वतीने सांगण्यात आले.

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१ ऑक्टोबर -**

श्री तुळजाभवानीची धाकटी बहीण म्हणून राज्यभर परिचीत असणाऱ्या आई येडेश्वरीदेवीच्या नवरात्र महोत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. गुरुवार (दि.३) ऑक्टोबर अश्विनशुद्ध प्रतीपदेस रात्री ८ वा. देवीची पंचोपचार महापूजा, महाआरतीने घट स्थापनेने श्री येडेश्वरी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवास सुरवात होणार आहे.

श्री तुळजाभवानीची धाकटी बहीण म्हणुन श्री येडेश्वरी देवी प्रसिद्धी असल्याने तुळजाभवानीचे दर्शन झाल्यानंतर प्रत्येक भाविक येडेश्वरी देवीच्या दर्शनासाठी येतो. नवसाला पावणारी जागृत देवस्थान म्हणून श्री येडेश्वरी देवी महाराष्ट्रासह परराज्यात प्रसिद्ध आहे. त्यामुळे लाखो भाविक या नवरात्र महोत्सव काळात देवी दर्शनासाठी येतात. नवरात्र काळात देवीच्या वेगवेगळ्या रूपाच्या पूजा दररोज देवीच्या तांदळ्यावर वाखाड्या लिंबाच्या पत्री पानाने पूजा केल्या जातात यामध्ये गुरुवार (दि.३) घट स्थापने दिवशी नागवेलीच्या पानाने पारंपरिक महापूजा, महा आरतीने घट स्थापना होणार आहे.रात्रजागर भजनी मंडळ येरमाळा, बाभळगांव यांचा भजनी कार्यक्रम, शुक्रवारी (दि.४) एक वेढ्याची पूजा करण्यात येणार आहे. तर रात्रजागर पानगाव, परतापुर, सटवाईवाडी मंडळाचा भजनी कार्यक्रम, शनिवारी (दि.५) दोन वेढ्याची पूजा करण्यात येणार आहे. तर रात्रजागर उमरा, मलकापूर मंडळाचा भजनी कार्यक्रम, रविवारी (दि.६) चंद्राची पूजा करण्यात येणार आहे. तर रात्रजागर नागझरवाडी येथील भजनी मंडळाचा भजनी कार्यक्रम, सोमवारी (दि.७) मोराची पूजा करण्यात येणार आहे. तर जागर शेलगाव (ज.) येथील भजनी मंडळाचा भजनी कार्यक्रम देवीच्या नवरात्रीतील पाचव्या माळेला ललित पंचमी पंचरात्री निमित्त रात्री नऊ वाजता देवीच्या पालखीचा छबिना होणार आहे.या दिवशी विविध प्रकारे देवीचे नवरात्रीचे वृत करणाऱ्या महिला भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी असते. मंगळवारी (दि.८) आकडयाची पूजा करण्यात येणार आहे. या दिवशी रात्रजागर कसबे तडवळे येथील भजनी मंडळाचा भजनी कार्यक्रम, बुधवारी (दि.९) नारळाची पूजा करण्यात येणार आहे.

तर रात्रजागर कण्हेरवाडी, बांगरवाडी येथील भजनी मंडळाचा भजनी कार्यक्रम गुरुवारी (दि.१०) साखळीची पूजा करण्यात येणार आहे. तर रात्रजागर उक्कडगाव (ता. बार्शी.), उपळाई येथील भजनी मंडळाचा कार्यक्रम शुक्रवारी (दि.११) वाघाची पूजा करण्यात येणार आहे.

महाष्टमी निमित्त उत्तररात्री होमहवन आरंभ तर अश्विन शुद्ध नवमीच्या पहाटे सूर्योदयापूर्वी होम बलिदान पूर्णाहूती नंतर देवीची महापूजा, आरती नंतर देवीला पुरणपोळीचा नेवैद्य दाखवण्यात येईल पंचक्रोशीतील भाविकांची पूर्णाहुती होमहवण पाहण्यासाठी नेवैद्य दाखवण्यासाठी भल्या पहाटे पासुन गर्दी होते.

# उमरगा-लोहारा तालुक्यातील मागासवर्गीय वस्त्यांसाठी ५ कोटी रूपये मंजुर : आ. ज्ञानराज चौगुले

## बौध्द विहार, समाजमंदिर, स्मशानभुमीची होणार कामे...

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१ ऑक्टोबर -**



उमरगा व लोहारा तालुक्यातील मागासवर्गीय वस्त्यांमध्ये बौध्द विहार बांधकाम, समाजमंदिर बांधकाम, स्मशानभुमी बांधकाम, समाजमंदिरास संरक्षक भिंती, अंतर्गत रस्ते, आदी ३७ गावांमधील ३९ कामांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना २०२४-२५ अंतर्गत सुमारे ५ कोटी रू. निधी मंजुर झाल्याची माहिती आ. ज्ञानराज चौगुले यांनी दिली आहे.

या कामांना निधी मंजुर होण्यासाठी मुख्यमंत्री तथा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ते सातत्याने पाठपुरावा करीत होते. या पाठपुराव्यास यश आले आहे. या कामासाठी निधी मंजुर केल्याबददल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, तसेच याकामी वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबददल माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड यांचे आ. चौगुले यांनी आभार मानले आहेत.

# मंगरुळ ही माझी कर्मभूमी : मधुकरराव चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१ ऑक्टोबर -**



तुळजापूर तालुक्यातील येथे २९ सप्टेंबर रोजी मंगरूळ जिल्हा परिषद गटातील काँग्रेस कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी बोलताना अणदूर जरी माझी जन्मभूमी असली तरी मंगरूळ ही माझी कर्मभूमी असल्याचे प्रतिपादन केले व जुन्या आठवणींना उजाळा दिला.

येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आत्तापर्यंत ज्या पद्धतीने सहकार्य केले आहे. तसेच सहकार्य करावे, अशी विनंती करून विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे व मीच भरघोस मताने विजयी होणार असा आत्म विश्वासही व्यक्त केला. कार्यकर्त्यांनी विरोधकांच्या भूलथापांना बळी पडू नये काँग्रेस पक्षाची विचारधारा घराघरात पोहचवा असे आव्हानही केले. या काँग्रेस कार्यकर्ता संवाद मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मुकुंद डोंगरे हे होते. तर कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून विश्वासराव उपासे, शहेबाज काझी, प्रकाश चव्हाण, शिवाजी गायकवाड, बाजार समिती संचालक रामचंद्र ढवळे, अशोक पाटील, लक्ष्मण सरडे, शहबाझ काझी, अझहर मुजावर, काशिनाथ बंडगर, दिलीप सोमवंशी, बालाजी बंडगर, ऋषिकेश मगर, सरपंच महेश डोंगरे, उपसरपंच गिरीश डोंगरे, अशोक बचाटे, बलभीम डोंगरे, दिलीप भोकरे, विलास सरडे, अभिजीत चव्हाण प्रा. मोहन कचरे, अमर माने, अशोक शिंदे, अरुण कोळगे, इमाम शेख, रामेश्वर आबा तोडकरी, गौरीशंकर कोडगीरे होते.

# मैत्री कर म्हणत सहशिक्षिकेचा विनयभंग: गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१ ऑक्टोबर -**

सहशिक्षिकेचा विनयभंग केल्याप्रकरणी शिक्षिकेच्या तक्रारीवरून येथील एका शाळेच्या मुख्याध्यापक विरोधात मुरूम पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर या घटनेने शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत मुरूम पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, मुरूम येथील डॉ. झाकीर हुसेन विद्यालयात कार्यरत असलेली एक शिक्षिका मस्टरवर सही करण्यासाठी कार्यालयात गेली असता मुख्याध्यापक नूर अहमद कानकुर्ती यांनी लैंगिक छळ करण्याच्या उद्देशाने माझ्याशी मैत्री कर म्हणत शिक्षिकेचे हात पकडून विनयभंग केला व जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारानंतर पीडित शिक्षिकेने मुख्याध्यापकाच्या कानशिलात लगावत मुख्याध्यापका विरोधात मुरूम पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. या घटनेने शहर व शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

# महाराष्ट्रातील महिला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी : ज्योती वाघमारे



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१ ऑक्टोबर -**

शिवसेना प्रवक्त्या ज्योती वाघमारे महिलांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या कि, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केल्याने महिलांमधुन मोठ्या प्रमाणात समाधान व्यक्त होत आहे. तर दुसरीकडे विरोधक ही योजना फसवी व फक्त निवडणुकीपर्यंत असल्याच्या अफवा पसरवत आहेत. विरोधक एवढ्यावरच न थांबता सदर योजना बंद करण्यासाठी न्यायालयात पण गेले आहेत. तसेच महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे विकासाचा रथ गेल्या अडीच वर्षापासून हाकत आहेत. त्यांनी महायुती सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्रात खूप मोठ्या प्रमाणात विकास कामे करत विविध योजनाही राबवत आहेत. त्यांच्यासोबतच उमरगा-लोहारा तालुक्याचे आमदार ज्ञानराज चौगुले यांनीही उमरगा-लोहारा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात निधी आणुन मतदारसंघाचा कायापालट केलेला आहे. यामुळे महाराष्ट्रातील व उमरगा-लोहारा तालुक्यातील महिला भगिनी आपल्या आशीर्वादाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विकासाचा रथ अविरतपणे सुरू ठेवण्याकरीता त्यांना पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदी विराजमान करतील व त्यांच्यासोबतच आमदार ज्ञानराज चौगुले यांनाही विधानसभेत चौथ्यांदा नक्की पाठवतील असा विश्वास ज्योती वाघमारे यांनी व्यक्त केला.

लोहारा शहरातील बस्वेश्वर मंदिरात युवती सेना मराठवाडा निरीक्षक तथा ज्ञानज्योती सामाजिक बहुउद्देशीय संस्था अध्यक्ष ॲड. आकांक्षाताई ज्ञानराज चौगुले यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२९ सप्टेंबर रोजी महिला सक्षमीकरण मेळावा उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा वैशाली खराडे होत्या तर प्रमुख म्हणुन शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन पणुरे, तालुका प्रमुख जगन्नाथ पाटील, गटनेत्या सारिका बंगले, ज्ञानज्योती महिला सहकारी पतसंस्था सचिव मिरा माळी (लोहारा), शिवसेना महिला आघाडी प्रमुख रितु गोरे, नगरसेविका कमल भरारे, सुमन रोडगे, शमाबी शेख, आरती कोरे, संगिता पाटील, सरपंच आशा कदम (कानेगाव), अदि व्यासपिठावर उपस्थित होत्या. यावेळी ॲड. आकांक्षा ज्ञानराज चौगुले यांनीही उपस्थित महिलांना सविस्मातर र्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक गटनेत्या सारिका बंगले व सुत्रसंचालन भाग्यश्री कुंभार यांनी केल्या तर आभार नगराध्यक्षा वैशाली खराडे यांनी मानले.

या कार्यक्रमास माजी गटनेते अभिमान खराडे, नगरसेवक अविनाश माळी, प्रमोद बंगले, नगरसेवक जालिंदर कोकणे, परवेज तांबोळी, माजी नगरसेवक आयुब शेख, विनोद मुसांडे, रमेश जाधव, उपतालुका प्रमुख परमेश्वर साळुंके, ओम कोरे, दत्ता मोरे, सुरेश दंडगुले, जितेंद्र कदम, लता कोकणे, रजिया जेवळे, उषा बनसोडे, यांच्यासह शिवसेना कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# सोयाबीन अनुदान वितरण सुरू; जिल्ह्यातील तीन लाख ७१ हजार शेतकऱ्यांना मिळणार लाभ

## महायुती सरकार शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीशी : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ ऑक्टोबर -**

जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकर्यांना खरीप २०२३ सालातील अनुदानाचे वितरण सोमवारपासून सुरू झाले आहे. प्रतिहेक्टर ५००० रूपयांप्रमाणे जिल्ह्यातील तीन लाख ७१ हजार शेतकर्यांच्या खात्यावर हे अनुदान जमा होण्यास सुरू झाले आहे. राज्यातील महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

खरीप २०२३ मध्ये सोयाबीन आणि कापसाच्या बाजारभावातील दर कमी झाल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते.

शेतकऱ्यांच्या मदतीसाठी महायुती सरकारने सोयाबीन आणि कापूस उत्पादकांना प्रतिहेक्टर पाच हजार रूपयांचे आर्थिक सहाय्य अनुदान म्हणून जाहीर केले होते.



त्याबाबतचा शासन निर्णय देखील त्यावेळीच जारी करण्यात आला होता. ई-पीक पाहणीची अट रद्द केल्यामुळे अनुदानापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ झाला. जिल्ह्यातील एकूण तीन लाख ७१ हजार २०२ शेतकऱ्यांना सोयाबीनच्या अनुदानापोटी सोमवारपासून प्रतिहेक्टर पाच हजार रूपयांप्रमाणे दोन हेक्टरच्या मर्यादेत अनुदान मिळण्यास सुरूवात झाली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील चार लाख २९ हजार शेतकरी इ-पीक पहाणीनुसार अनुदानास पात्र ठरले आहेत. त्यापैकी तीन लाख ७१ हजार २०२ शेतकऱ्यांनी त्यांचे समंतीपत्र दिलेले आहे.

पहिल्या टप्प्यात संमतीपत्र दिलेल्या एकूण शेतकऱ्यांपैकी दोन लाख ९७ हजार २०२ शेतकऱ्यांच्या थेट खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्यास प्रारंभ झाला आहे. उर्वरित ७४ हजार शेतकऱ्यांची ई-केवायसी होणे अद्याप बाकी आहे.

त्यामुळे त्यांच्या खात्यावर ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही अनुदानाची रक्कम जमा केली जाणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले. ई-पीक पाहणी न केलेले आणि ७/१२ उताऱ्यावरही पीकाची नोंद नसलेले साधारणपणे ५ टक्के शेतकरी या अनुदानापासून वंचित राहिले असल्याची माहिती आहे. तशा काही तक्रारीही आपल्याकडे प्राप्त झाल्या आहेत.

त्यांनाही अनुदान मिळवून देण्यासाठी आपला पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

### या काळातील ७२ तासांची मुदत गृहीत धरली जाणार नाही

प्रधानमंत्री पीकविमा योजनेअंतर्गत यंदाच्या हंगामात २३ ते २७ सप्टेंबर दरम्यान अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकरी काढणीपश्चात विमा कंपनीला त्याबाबत माहिती देत आहेत. २७ सप्टेंबर रोजी रात्री पोर्टल बंद असल्यामुळे अनेकांना नुकसानीची सूचना देता आली नाही. ज्या कालावधीत पोर्टल बंद होते, त्या कालावधीत नुकसानीची सूचना देण्यासाठी ७२ तासांची असलेली मुदत गृहित धरली जाणार नाही, याची नोंद जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी घ्यावी, असे आवाहनही आ. पाटील यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेतकऱ्यांच्या मालवाहतूक वाहनांकडून टोल घेऊ नका

खा.बजरंग सोनवणे यांचर राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांना सुचना, झेडपी, जिल्हाधिकारी कार्यालयात मॅरोथॉन बैठक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ ऑक्टोबर**

कधी अस्मानी तर कधी सुल्तानी संकटाचा सामना करणाऱ्या माझ्या शेतकऱ्यांच्या मालवाहतूक वाहनांकडून टोल घेवू नका, अशा शब्दात खा.बजरंग सानवणे यांनी राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांना सुचना दिल्या तर जलजीवन मिशनद्वारे नागरिकांना पाणी देण्याचे पुण्याचे काम होत आहे. यात कोणीही पाण्यावर लोणी काढण्याचे पाप करू नये, अशी तंबीही दिली.



जिल्हा परिषदेत जलजीवन मिशनच्या विषयात ग्रामीण पाणी पुरवठा अधिकाऱ्यांची बैठक खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत पार पाडली. ही बैठक दोन तास सुरू होती. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना पाणी पुरवठ्याची कामे दर्जेदार करून घ्या, कामात हयगय झाली तर कोणीचीही गय केली जाणार नाही, असा इशारा दिला तर जिल्हाधिकारी कार्यालयात रेल्वे आणि राष्ट्रीय महामार्गाबाबतीत आढावा बैठक घेतली.जिल्हा परिषद प्रशासनाकडे असलेल्या जलजीवन मिशन योजनेला मरगळ आलेली असून काही ठिकाणी अर्धवट कामे करून पैसे उचलले जात असल्याचे समोर येत आहे. यामुळे अधिकाऱ्यांनी कामे दर्जेदार करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत. गावात पाणी देणे हे पुण्याचे काम असून सदरील कामे करताना सामान्य माणसाला पाण्यासाठी फिरण्याची वेळ येऊ देऊ नका. अशा काही तक्रारी आल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही, असे म्हणत अर्धवट कामांची प्रगती दाखविण्याच्या सुचना त्यांनी दिल्या. तर जलजीवन योजनेसाठी लागणार निधी आणण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न करू, पैशाची काळजी करू नका, असेही म्हटले.अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे काम तत्काळ पुर्ण करा, त्यासाठी जे-जे करता येईल ते करा, भुसंपादनाचे विषय तातडीत मार्गी लावा, अशी तंबीही अधिकाऱ्यांना दिली.बैठकीत राष्ट्रीय महामार्गाचा आढावा घेत असताना शेतकऱ्यांच्या बाबतीतला महत्वाचा विषय म्हणजे शेतकऱ्यांच्या माल घेऊन जाणाऱ्या कुठल्याही वाहनाला टोल न घेण्याच्या सूचना दिल्या. पालखी मार्ग असलेल्या पैठण-पंढरपूर मार्गाच्या विषयाला खा.सोनवणे यांनी हात घालत रखडलेल्या कामामध्ये तत्काळ मार्ग काढून सदरील काम तातडीने सुरू करा, असे त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले.

जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गाची बहूतेक कामे रखडली आहेत. बीड तालुक्यातील नवगण राजुरी, माजलगाव तालुक्यातील सादोळा यासह आलेल्या निवेदनानुसार चुकीच्या होत असलेल्या कामामध्ये दुरूस्ती करण्याबाबतच्या सूचना दिल्या.

# ४ऑक्टोबर लाभार्थीची निवड लॉटरी पद्धतीने होणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ ऑक्टोबर**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) बीड जिल्हा कार्यालयास सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरिता प्रकल्प मर्यादा ५ लाख असलेली सुविधा कर्ज योजने अंतर्गत ६० चे भौतिक उद्दिष्ट व १.४ लाख प्रकल्प मर्यादा असलेल्या महिला समृद्धी योजने अंतर्गत ५० चे उद्दिष्ट आहे.

उपरोक्त उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता स्थानिक व वर्तमान पत्रामध्ये बातमी देऊन कर्ज मागणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने महामंडळाच्या वेबसाईटद्वारे दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ ते २० मार्च २०२४ या कालावधीत कर्ज मागणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात अर्ज स्विकारण्यात आलेले आहेत.

सुविधा कर्ज योजने अंतर्गत एकूण ५४९ कर्ज प्रकरणे प्राप्त झालेले असून त्यापैकी ४९७ पात्र व ५२ अपात्र असून पात्र अर्जदारामधून चिठ्याद्वारे (लॉटरी पद्धतीने) लाभार्थीची निवड करावयाची आहे.

महिला समृद्धी योजने अंतर्गत एकूण ७१ कर्ज प्रकरणे प्राप्त झालेले असून त्यापैकी ६५ पात्र व ०६ अपात्र असून पात्र अर्जदारामधून चिठ्याद्वारे (लॉटरी पद्धतीने) लाभार्थीची निवड करावयाची आहे.अपर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष लाभार्थी निवड समिती बीड यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०४ /१०/ २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृह नगर रोड, बीड या ठिकाणी चिठ्याद्वारे (लॉटरी पद्धतीने) लाभार्थीची निवड होणार आहे. संबधित पात्र अर्जदाराने उपस्थित राहावे. असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाये जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

# श्री बंकटस्वामी महाविद्यालय स्वच्छता ही सेवा अभियान कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ ऑक्टोबर**

दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छता ही सेवा २०२४ अंतर्गत अभियान दिनांक १७ सप्टेंबर २०२४ ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत संपन्न होणाऱ्या विविध कार्यक्रमाच्या अंतर्गत महाविद्यालयामध्ये स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी महाविद्यालय परिसर स्वच्छ करून गंगाधाम कॉलनी परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत महाविद्यालय संपूर्ण स्वच्छ करण्यात आले.तसेच महाविद्यालयामध्ये लावलेले वृक्ष यांना आळे करण्यात आले.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांना स्वच्छतेचे महत्त्व तसेच आपला स्वभाव याविषयी वर्तनामध्ये बदल कसा होतो याविषयी विविध कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये महाविद्यालयांमध्ये उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे यांनी स्वच्छते विषयी शपथ दिली. यामध्ये प्रत्येक स्वयंसेवकांना शपथ देण्यात आली की मी प्लास्टिकचा वापर करणार नाही, तसेच पर्यावरणाला हानी पोहोचले अशी कोणत्याही प्रकारची कृती करणार नाही,पाणी बचती विषयी कायम सतर्क राहील.तसेच कोणत्याही प्रकारचे व्यसन करणार नाही अशा प्रकारची शपथ देण्यात आली.यामध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय असा सहभाग घेतला आणि त्यांना पुढील कृती करण्यास सांगितले की आपण आपल्या परिसरामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी असणारा प्लास्टिक कचरा जमा करून महाविद्यालयामध्ये आणावा या कृती मधून महाविद्यालयामध्ये २० किलो प्लास्टिक कचरा स्वयंसेवकांनी जमा केला. तसेच कॉलनी मधील नागरिकांना देखील कचऱ्यामुळे होणारे आजार दुर्गंधी याविषयी जनजागृती पर रॅली काढण्यात आली. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.मनोजकुमार नवसे, डॉ.शंकर शिवशेट्टे, डॉ. प्रकाश कोंका राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉ. अरुण दैतकार यांची उपस्थिती होती. याप्रसंगी महाविद्यालयातील बहुसंख्य.विद्यार्थी स्वयंसेवक, शिक्षक, प्राध्यापक उपस्थित होते.

# आधारभुत किंमत खरेदी योजनेसाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोदणी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ ऑक्टोबर**

सर्व शेतकरी बांधवाना सुचित करण्यात येते की, खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये बीड जिल्हयात आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत नाफेड मार्फत तालुकानिहाय १६ केंद्रावर मुग, उडीद व सोयाबीन या पिकाची ऑनलाईन शेतकरी नोंदणी दिनांक ०१ ऑक्टोबर २०२४ पासून सूरु झाली आहे. मुग, उडीद खरेदी दिनांक १० ऑक्टोबर २०२४ पासून व सोयाबीन खरेदी दिनांक १५.१०.२०२४ पासून शासनाच्या आदेशानुसार खरेदी सुरु करण्याचे आदेश प्राप्त झालेले आहेत. तरी शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या खरेदी केंद्रावर स्वत: जावून ऑनलाईन नोंदणी करावी करण्याचे आवाहन जिल्हा पणन अधिकारी यांनी केले आहे.

नोंदणीसाठी आपले आधारकार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे छापील पासबुक (अकाउंट नंबर व आय.एफ.एस.सी. कोड स्पष्ट दिसावा) ऑनलाईन पीक पेरा असलेला ७/१२ उतारा घेउन आपल्या पिकाची नोंदणी करावी.

मालाचा प्रकार,नोंदणी कालावधी खरेदी कालावधी

मुग ०१ ते १० ऑक्टोबर २०२४ दि. ०७.०१.२०२५,उडीद ०१.१०.२०२४ पासून दि. १०.१०.२०२४ ते दि. ०७.०१.२०२५,सोयाबीन ०१.१०.२०२४ पासून दि. १५.१०.२०२४ ते दि.१२.०१.२०२५ आधारभूत किंमत:-मूंग - ८६८२/- रुपये प्रती क्विंटल उडीद- ७४००/- रुपये प्रती क्विंटल, सोयाबीन- ४८९२/- रुपये प्रती क्विंटल, बीड जिल्हयात १६ खरेदी केंद्राना खालील प्रमाणे मुंग, उडीद, सोयाबीन नोंदणी व खरेदी केंद्र सुरु करण्यात आलेले आहेत.तालुका खरेदी केंद्राचे ठिकाण,खरेदी केंद्र संस्थेचे नाव:अंबाजोगाई,मोंढा मार्केट यार्ड अंबाजोगाई, अंबाजोगाई तालुका खरेदी विक्री संघ लि.अंबाजोगाई,अंबाजोगाई बर्दापूर किसान कृषी निविष्टा सहकारी संस्था बर्दापुर,अंबाजोगाई घाटनांदूर, आदित्य कृषि निविष्टा सहकारी संस्था मर्या. हनुमंतवाडी अंबाजोगाई,जोगाईवाडी,वसुंधरा फळे भाजीपाला व फुले सहकारी खरेदी विक्री संस्था अंबाजोगाई,आष्टी मार्केट यार्ड कडा,जामगाव सेवा सहकारी सोसायटी लिमिटेड जामगाव,आष्टी शिराळा किसान विकास सर्वसाधारण सहकारी संस्था मर्या.शिराळ बीड बहिरवाडी, भैरवनाथ कृषि निविष्टा सर्वसाधारण सहकारी संस्था बहिरवाडी,बीड चौसाळा यशोदिप बहुउद्धेशिय सर्व सेवा सहकारी संस्था मर्या.साखरे बोरगांव धारुर, मार्केट यार्ड धारुर किल्लेधारुर, तालुका खरेदी विक्री संघ धारुर, गेवराई मोंढा मार्केट यार्ड गेवराई,गेवराई तालुका खरेदी विक्री संघ गेवराई,केज धारुर रोड केज,केज तालुका सहकारी खरेदी विक्री संघ केज,माजलगाव बीड रोड माजलगाव,अॅड. रामराव नाटकर, कृषी निविष्टा सहकारी संस्था माजलगाव,परळी ब्रंम्हवाडी परळी, परळी वैजीनाथ तालुका सहकारी खरेदी विक्री सघं परळी,पाटोदा मोंढा मार्केट,पाटोदा,पाटोदा तालुका कृषि प्रक्रिया सहकारी संस्था कुसळंब,शिरुर शिरुर सिंदफणा शेतमाल पुरवठा व विक्री सहकारी संस्था मर्या. लोणी,वडवणी महालक्ष्मी बहुउद्धेशिय सर्व सेवा सहकारी संस्था मर्या.

# डॉ.अशोक थोरात यांची जिल्हा शल्यचिकित्सकपदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ ऑक्टोबर**



बीड येथील जिल्हा रुग्णालयात सर्वांना सोबत घेऊन कारभार करणारे डॉ.अशोक थोरात यांची पुन्हा एकदा बीडच्या जिल्हा शल्य चिकिस्तकपदी वर्णी लागली असुन ते डॉ.अशोक बडे यांच्या जाग्यावर आले आहेत. बीड जिल्ह्यात डबघाईला आलेली आरोग्य यंत्रणा डॉ.अशोक थोरात यांच्या नेमणूकीमुळे एकदा घडबडून जागी होऊन आप आपल्या आरोग्यकेंद्रात कामाला लागणार असल्याने बीड जिल्ह्यातील आरोग्य विभागाला अच्छे दिन येणार असल्याचे दिसु लागले आहे.

बीड जिल्हा शल्यचिकीत्सक पदाचा कारभार डॉ.अशोक थोरात यांच्या असताना त्यांनी जिल्ह्यातील सर्वच आरोग्य केंद्राकडे बारकाईने लक्ष घालून कारभार व्यवस्थित चालवला होता. डॉ.अशोक थोरात यांच्या तत्परतेमुळे अनेक गोरगरीब रुग्णांना जीवदान मिळाले होते. शासकीय नियमानुसार त्यांची नाशिक येथे सीएस पदावर नेमणूक झाली होती.त्यांनी त्याठीकाणी ही काम व्यवस्थित पणे केले.त्यानंतर त्यांची सहाय्यक संचालक म्हणून बदली झाली होती.आता पुन्हा तेथून त्याची बीडचे शल्यचिकीत्सक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.डॉ.अशोक बडे यांच्याकडे आता परभणी येथील वैद्यकीय अधिकारी जबाबदारी सोपविण्यात आली आहे. डॉ. अशोक थोरात यांची पुन्हा एकदा बीड बदली झाल्यामुळे त्यांचे बीड जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांनकडून स्वागत करुण अभिनंदन करण्यात येतं आहे.

# बीड शिवसेनेच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लाभार्थी महिलांचा मेळावा संपन्न!

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ ऑक्टोबर**



तळागाळातील माणसांची जाण असणारे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी आपल्या कार्यकाळात अठरा-अठरा तास काम करून सामान्य जनतेच्या भल्यासाठी मोठमोठी आणि लोकांभिमुख निर्णय घेतले आहेत. यात सर्वात महत्वाचे म्हणजे महिला सबळीकरणासाठी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, माझी लाडकी बहीण योजना, बस प्रवासात पन्नास टक्के सवलत असेल अशा अनेक महिलांसाठीच्या उपयुक्त योजना शिंदे साहेबांनी राबविल्या आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिला मुख्यमंत्री असा आहे ज्यांनी महाराष्ट्रभरातील महिलांना माझी लाडकी बहीण म्हणून हाक देत सन्मान दिला आहे. महिलांचा सन्मान आणि महिलांचे सबळीकरण हा ध्यास घेऊन आपली वाटचाल करणारे एकनाथजी शिंदे साहेब महाराष्ट्र भल्यासाठी, महिला सबळीकरणासाठी पुन्हा एकदा मुख्यमंत्री होणे काळाची गरज आहे त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व महिलांनी आपल्या लाडका भाऊराया असणाऱ्या शिंदे साहेबांना येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत विजयी करून पुन्हा एकदा मुख्यमंत्री बनविण्यासाठी मोठ्या ताकदीने उभे राहायचे आहे असे शिवसेना मराठवाडा संपर्कप्रमुख विधानसभा समन्वयक शुभांगीताई नांदगावकर यांनी प्रतिपादन केले.

# माहिती अधिकार कायदा २००५ व प्रत्यक्ष अंमलबजावणी या विषयावर व्याख्यान



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ ऑक्टोबर**

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभागामार्फत माहितीच्या सार्वत्रिक प्रवेशासाठी आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त माहिती अधिकार कायदा २००५ व प्रत्यक्ष अंमलबजावणी या विषयावर बलभीम महाविद्यालयाचे समाजशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक डॉ.कुंडलिक खेत्री यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.अतिथी व्याख्यानादरम्यान डॉ.खेत्री सर यांनी माहिती अधिकार कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी व त्याप्रसंगी येणाऱ्या अनंत अडचणींचा उहापोह केला. सदरील कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर अध्यक्ष म्हणून उपस्थित होते त्याचबरोबर कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर संचालक डॉ.ए.एस. खान उपस्थित होते.कार्यक्रमासाठी संस्थेचे प्रशासक डॉ. विश्वंभर देशमाने सर व डॉ. सुधाकर गुट्टे यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमासाठी प्रभारी विभागप्रमुख डॉ.पल्लवी ईरलापल्ले डॉ.पांडुरंग केदार डॉ.पांडुरंग सुतार डॉ.संजय मोरे व डॉ.गणेश कदम यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाची डॉ.गणेश कदम यांनी प्रास्तावित केले व डॉ.संजय मोरे यांनी आभार प्रदर्शन केले.

# चौसाळा महाविद्यालयात पोषण माहचा समारोप



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ ऑक्टोबर**

कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे गृहशास्त्र विभाग व महिला कक्षाच्या वतीने संपूर्ण सप्टेंबर महिना पोषण माह म्हणून विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना आपल्या योग्य व पोषण युक्त आहाराबद्दल सजगता निर्माण व्हावी. म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि ३०/०९/२०२४ रोजी या पोषण माह च्या समारोपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना उपप्राचार्य गणपती ढवळशंख म्हणाले की पोषण आहाराबद्दल विद्यार्थ्यांनी विशेषत: मुलीनी सतर्क राहने गरजेचे आहे आपण कशा प्रकारचे अन्न खातो. या कडे लक्ष दिले पाहिजे अन्न फक्त चवदार असून चालत नाही. तर ते सकस व पोषणयुक्त असले पाहिजे अद्यक्षीय भाषण करताना प्रा. डॉ. विलास भिल्लारे म्हणाले की गृहशास्त्र विभागाने महिनाभर खूप चांगले कार्यक्रम केले असून या पोषण माह मुले विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होईल प्रस्थाविक करताना डॉ. सय्यद शाहीन म्हणाल्या या महिन्यामध्ये महाविद्यालयात मेंहदी स्पर्धा, व्याख्यान, पाककृती स्पर्धा, सलाड सजावट स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, तृणधान्याचे महत्व यावर व्याख्यान असे विविध कार्यक्रम घेण्यात आले या साठी विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. या समारोपाच्या कार्यक्रमाचे आभार प्रा. सीमा पवार यांनी केलेव्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. चांगदेव शेळके व पदयुत्तर संचालक डॉ. सुधाकर वणवे उपस्थीत होते. या कार्यक्रमासाठी प्रा. अरुणा नावेकर, प्रा. आफरीन सय्यद, प्रा. मनीषा गिराम, कार्यालयीन अधीक्षक श्रीमती संगीता खडके, श्रीमती सारिका सवाई, श्रीमती मुंडे शीतल यांच्या सह प्राध्यापक , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एमआयटी.विश्वशांती विद्यापीठ पुणे यांचा 'समर्पित जीवन गौरव पुरस्कार' महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांना जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**नेकनूर दि.१ ऑक्टोबर**

विज्ञान अध्यात्म आणि तत्वज्ञान जागतिक परिषदेचे औचित्य साधून संबंध वारकरी संप्रदायाचा ध्यास आणि श्वास असणाऱ्या अध्वर्य ,घराण्यातील सत्पुरुष म्हणून एम.आय.टी. विश्वशांती विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने सद्गुरु बंकटस्वामी महाराज संस्थानचे सर्वेसर्वा महंत गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे यांना यावर्षीचा 'समर्पित जीवन गौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आला असून ३ ऑक्टोंबर रोजी जागतिक परिषद सोहळ्यात पुणे येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. यासंबंधीची घोषणा व तसे निमंत्रण श्री.महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांना मिळाले असून संतश्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर माऊली जन्म उत्सव सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष व श्री. संत जगत्गुरु श्री.तुकाराम महाराज यांचे ३७५ व्या वैकुंठ गमन सोहळा वर्ष पर्वात विज्ञान अध्यात्म आणि तत्वज्ञानाची सांगड असलेल्या जागतिक परिषदेच्या औचित्याने माईर्स ( एम. आय. टी.) विश्वशांती केंद्र पुणे यांना वारकरी संप्रदायातील जुन्या परंपरेतील थोर, जाणकार, मानव कल्याणाचे कार्य करणाऱ्या, पावन घराण्यातील थोर निष्ठावंत अश्या धर्मप्रसारक सत्पुरुषांचा 'समर्पित जीवन गौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात येत आहे.



# महिला सफाई कामगाराकडुन लाच घेणाऱ्या स्वच्छता निरीक्षकास अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ०१ ऑक्टोबर-**

महिला सफाई कामगाराकडून महापालिकेच्या स्वच्छता निरीक्षकाने चार हजार रुपयांची लाच मागून त्यापैकी दोन हजार रुपये स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून या स्वच्छता निरीक्षकास अटक करुन त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. हि कारवाई आज दि. १ ऑक्टोबर रोजी करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, नांदेड महापालिकेच्या स्वच्छता निरीक्षक असलेल्या अकबर खान उस्मान खान याने कंत्राटी सफाई महिला कामगार असलेल्या तक्रारदार महिलेला तुझे २५ दिवसाचे खाडे झाले आहेत. तु मला पाच हजार रुपये दिलेस तर तुझी पगार करतो, असे सांगितले. सदर महिलेने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. यानंतर तक्रारदार व स्वच्छता निरीक्षक यांच्यात चर्चा होवून त्यापैकी चार हजार रुपये देण्याचे ठरले. त्यापैकी पहिला हप्ता म्हणून स्वच्छता निरीक्षक अकबर खान उस्मान खान याने सदर महिलेकडून दोन हजार रुपयांची लाच स्विकारली व सदरची रक्कम आपल्या मोटारसायकलच्या पेट्रोल टाकीवरील कव्हरमध्ये ठेवण्यास सांगितले. हि रक्कम स्विकारताना लगेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पथक पोहंचले व अकबर खान यास दोन हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडून त्याच्याविरुध्द पोलीस ठाणे विमानतळ येथे गुन्हा दाखल केला. त्यास अटक करण्यात आली असून पोलीस निरीक्षक सदानंद वाघमारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सदरचा सापळा यशस्वी केला.

# हदगाव येथे स्वराज्य पक्षाच्या वतीने नेत्ररोग शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. ०१ ऑक्टोबर-**

हदगाव-हिमायतनगर मतदारसंघातील स्वराज्य पक्षाचे उमेदवार माधव देवसरकर यांच्या वतीने आज तामसा येथे समाज उपयोगी नेत्ररोग शिबिर व मोफत शस्त्रक्रिया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात स्वराज्य पक्षाचे अनेक पदाधिकारी तसेच स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. वयोवृद्ध माता-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली नेत्र तपासणी करून शस्त्रक्रियेसाठी मोफत शिबिराचा लाभ घेतल्याची माहिती त्यांच्या जनसंपर्क कार्यालयातून कळविण्यात आली.




स्वराज्य पक्ष नेहमीच समाजाच्या तळागाळातील लोकांसाठी कार्य करत आला आहे आणि या कार्यक्रमाच्या माध्यमातून पक्षाची सेवावृत्ती पुन्हा एकदा अधोरेखित झाली. हदगाव-हिमायतनगर मतदारसंघातील जनतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विशेषतः आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या बाबतीत, स्वराज्य पक्षाने एक ठोस धोरण आखले आहे. पक्षाचा उद्देश केवळ निवडणुकीत विजय मिळवणे नसून, मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांची सामाजिक-आर्थिक प्रगती साधण्यासाठी कार्य करणे आहे. कार्यक्रमास उपस्थित स्वराज्य पक्षाचे नेते माधवराव पाटील देवसरकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, हदगाव-हिमायतनगर मतदारसंघाच्या जनतेच्या समस्या जाणून घेतल्या आहेत, आणि आम्ही त्या सोडवण्यासाठी सज्ज आहोत. आरोग्य क्षेत्रातील सेवेचा भाग म्हणून आजचे नेत्ररोग शिबिर हे समाजोपयोगी कार्यक्रमांच्या मालिकेतील पहिले पाऊल आहे. येणाऱ्या काळात रोजगार निर्माण करणे, शिक्षणाच्या सुविधा वाढवणे, आणि शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण राबवणे हे आमचे प्राधान्य राहणार आहे. स्वराज्य पक्षाचे ध्येय सर्वसमावेशक विकास साधून स्वावलंबी समाज निर्माण करणे आहे. यावेळी स्वराज्य पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. स्वराज्य पक्षाने आगामी निवडणुकीत जनतेच्या विश्वासावर उभे राहून प्रगतीची दिशा ठरवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या कार्यक्रमाला आलेल्या नागरिकांच्या मोठ्या सहभागामुळे स्वराज्य पक्षाची जनाधारावरील पकड अधिक दृढ होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### महाराष्ट्र नगरपरिषद राज्य संघटनेच्या सदस्यपदी मदने तर जिल्हा संघटकपदी सचिन गंगासागरे

**उमरी-** महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी/संवर्ग कर्मचारी संघटनेच्या राज्य सदस्यपदी उमरी नगरपरिषदेचे वरिष्ट लिपीक गणेश मदने तर जिल्हा संघटकपदी सचिन गंगासागरे यांची निवड करण्यात आली आहे . महाराष्ट्र राज्य नगरपरिषद , नगरपंचायत कर्मचारी संवर्ग कर्मचारी संघटना या शासन मान्यताप्राप्त संघटनेची सर्वसाधारण सभा व महामेळावा दिनांक २९ सप्टेबंर २०२४ रोजी तासगांव येथे पार पडली असुन त्यामध्ये महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी/संवर्ग कर्मचारी संघटनेचे राज्य सदस्य म्हणून उमरी नगरपरिषदेचे वरिष्ठ लिपीक गणेश शंकरराव मदने यांची तसेच जिल्हा संघटक म्हणून वरिष्ठ लिपीक सचिन संभाजी गंगासागरे यांची निवड करण्यात आली. त्यावेळी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी/संवर्ग कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष माजी प्रदेश अध्यक्ष रामेश्वर वाघमारे, वैजनाथ स्वामी, सतीष देशमुख आदीसह संघटनेतील विविध पदाधिकारी व उमरी नगरपरिषदेचे कर्मचारी चंद्रकांत श्रीकांबळे, गंगाधर पवार यांचेसह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील नगरपरिषदेचे कर्मचारी उपस्थित होते . गणेश मदने, सचिन गंगासागरे यांनी निवड झाल्या बद्दल विविध स्तरावरून अभिनंदनाचा वर्षा होत आहे




### जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत इंदिरा गांधी विद्यालय संघ प्रथम

**मुदखेड-**नांदेड येथील जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालयातील इनडोअर स्टेडियम मध्ये पार पडलेल्या शालेय स्तरावरील विविध क्रीडा स्पर्धेत कबड्डी या क्रिडाप्रकारात तालुक्यातील इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय मेंडका येथील १४ वर्षांखालील मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष टी एस चुकेवाड,संरपच ललीता इंजेपवाड तसेच गावकऱ्यांनी अभिनंदन केले आहे. या कबड्डी स्पर्धा जिल्हा क्रिडाधिकारी कार्यालयात इनडोअर हॉलमध्ये पार पडल्या व यात एकूण जिल्ह्यातील १६ संघानी भाग घेतला होता ; मागील दहा वर्षा पासुन क्रिडा स्पर्धत मेंडका संघाचे वर्चस्व आहे .सदरील संघ २०२३- २४ या वर्षी लातुर विभाग जिंकुन राज्य स्पर्धेत खेळला व तालुक्याचे नाव लौकीक केले . यासाठी शाळेचे मुख्याध्यापक विश्वनाथ चंदलवाड, क्रिडा शिक्षक पी एन पावडे यांनी परिश्रम घेतले.

### काशीनाथ किशन चौदंते यांचे निधन

**मुदखेड-**शहरातील भीमनगर येथील रहिवाशी काशिनाथ किशनराव चौदंते यांचे दिनांक ०१ ऑक्टोंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५५ वर्ष होते. त्यांचा अत्यविधी दि. ०१ ऑक्टोंबर रोजी दुपारी ०१:०० वाजता भीमनगर येथील बौद्ध स्मशानभूमी येथे करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली असा परिवार आहे. बाबुराव किशनराव चौदंते, काँग्रेस कमिटीचे शहरउपाध्यक्ष सूर्यकांत चौदंते (गुरुजी), विश्वनाथ चौदंते, सामाजिक कार्यकर्ता दादाराव चौदंते, सुभाष चौदंते, यांचे ते बंधू होत



### सहशिक्षक गोविंद मजरे बारूळकर प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**नवीन नांदेड -**दत्तात्रय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय हडको येथील सहशिक्षक गोविंद बाबुराव मजरे बारुळकर दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी ३२ वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आसल्याने विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहपत्नीक सत्कार करून अभिनंदन केले. श्री छत्रपती शिवाजी विद्यालय येथील सहशिक्षक गोविंद बाबुराव मात्रे हे वयोमानानुसार ३० सप्टेंबर २०२४ रोजी आपल्या सेवेतील ३२ वर्षे सेवाकाळ पूर्ण करून वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले त्यांच्या या सेवानिवृत्त निमित्ताने विद्यालयाच्या वतीने सह पत्नी सत्कार करून त्यांना पुढील निरोगी आयुष्याच्या शुभेच्छा देऊन अभिनंदन करण्यात आले.


### प्रा अरुण भोसले यांचा सेवापूर्ती कार्यक्रम संपन्न

**मुक्रमाबाद-**मुक्रमाबाद येथील श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा अरुण भिमराव भोसले सर हे वयोमानानुसार दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी अविरत २९ वर्ष सेवा करुन सेवानिवृत्त झाले. ते एक उत्तम प्राध्यापक (इतिहास,राज्यशास्त्र ) म्हणून विद्यार्थीप्रिय होते. त्यांचा सेवापूर्ती निरोप समारंभ दि. ०१ आक्टोबर रोजी श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाकडून आयोजित करण्यात आला . या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. व्यंकटराव पाटील गोजेगावकर,हे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे रामचंद्र (बबन)पाटील, बाबुराव पाटील आंदेगावकर, शिवशंकर पाटील कलंबरकर, प्राचार्य मुकुंदराज जाधव, प्राचार्य डॉ विवेक इनामदार हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ बालाजी खराबे यांनी केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य मुकुंदराज जाधव यांनी केले. या कार्यक्रमात माजी विद्यार्थी गिरी रामगिर, माळेगावे रामदास, शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास अजित पाटील तोडचिरकर,अच्युतराव कदम, हरिपाल कदम, अरुणराव कदम, प्रा हनमंत नारायण पाटील, मुक्रमाबाद नगरीतील वैद्यकीय क्षेत्रातील सर्व डॉक्टर आणि पत्रकार बंधु व आजी व माझी विद्यार्थी मोठ्या संख्येने भोसले सरांना सेवापूर्ती निमित्त शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रा अरुन भोसले यांनी आपली २९ वर्षातील वाटचाल अगदी कमी शब्दात प्रकट केली.शेवटी अध्यक्षीय समारोप मा. व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांनी केले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# बदलीवरून भडकले आयलाने; स्टेशन डायरीमध्ये केली मॅटमध्ये जाण्याची नोंद

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड , दि. ०१ ऑक्टोबर-**

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आल्याने यांची अचानकपणे नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. अनियमित पणे बदली झाल्याची तक्रार करत पोलिस निरीक्षक आयलाने यांनी आज पोलिस ठोणे सोडताना मॅटमध्ये जाण्याची स्टेशन डायरीत नोंद करुन रवानगी दाखविल्याची माहिती आहे.





ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांची दि. ३० सप्टेंबर रोजी रात्री नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली ग्रामीण पोलीस ठाण्याचा पदभार आता लोहा येथील पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्याकडे देण्यात आला आहे. दि. ३० सप्टेंबर रोजी बदली आदेश मिळाल्यानंतर दि. १ ऑक्टोबर रोजी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर ग्रामीण पोलीस ठाण्यात रुजू झाले. दरम्यान अचानक झालेल्या या बदलीमुळे भडकलेल्या पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांनी आज सकाळी ग्रामीण पोलीस ठाणे गाठून बदली अनियमितपणे करण्यात आल्याचे तक्रार करत मॅटे मध्ये जात असल्याची स्टेशन डायरीमध्ये नोंद केल्याची नोंद आहे. दरम्यान स्टेशन डायरीमध्ये नोंद केल्यानंतर त्यांनी रुजु झालेल्या पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्याशी देखील हुज्जत घातली. स्टेशन डायरी मध्ये नोंद करून पोलीस ठाण्यातील आपले साहित्य घेण्यासाठी आलेल्या पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांनी शाब्दिक खाल्ला चढवल्याने या ठिकाणी उपस्थित असलेले पोलीस कर्मचारी देखील आश्चर्यचकित झाले. यावेळी ओमकांत चिंचोलकर व नागनाथ आयलाने यांच्यात बंद दाराआड चांगलीच शाब्दिक चकमक उडाली असल्याची माहिती आहे

# राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेंज नागेश लुटेला सुवर्ण पदक



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ०१ ऑक्टोबर-**

पुणे येथे शालेय क्रीडा स्पर्धेतील राज्यस्तरीय जुडो क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या या मध्ये विद्यालयाचा खेळाडू नागेश नारायणराव लुटे या विद्यार्थ्याने क्रीडामार्गदर्शक तुकाराम पाटील पुयड यांच्या मार्गदर्शनाखाली १४ वर्षाखालील ६२ किलो वरील गटातून राज्यात पहिला क्रमांक मिळवून शाळेला राष्ट्रीय स्तरावर नेण्याचा पराक्रम केला.

क्रिडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद पुणे आयोजित राज्यस्तरीय जुडो क्रीडा स्पर्धा सन २४ चे आयोजन २८ व २९ सप्टेंबर रोजी पुणे येथील म्हाळुंगी क्रीडा संकुल येथे करण्यात आले होते,

यावेळी मराठवाड्यातील लातूर विभागाचे प्रतिनिधित्व करणारा नागेश नारायण लुटे यांनी १४ वर्षाखालील ६२ किलो वजन गटात प्रथम येऊन गोल्ड मेडॅल मिळविले आहे,या यशा बदल गुणवंत खेळाडूचे संस्थेचे अध्यक्ष पी.आर.सरसे संस्थेचे प्राचार्य अजय पाटील सरसे, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सरसे शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजय खेळाडू नागेश लुटेचे अभिनंदन करून त्यास राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

नागेश लुटे याला प्रल्हाद पाटील, अश्विनी सोळखे , जुदो कोच मार्गदर्शक, रविकिरण डोईफोडे, जगतसिंग गाडीवाले, दिलीप सिंग गाडीवाले, गुरूबचन गाडीवाले, विठ्ठलराव पाटील पुयड,तुकाराम पाटील पुयड, जगन्नाथ पाटील टरके,अमोल कंकाळ,

दिगंबर सुताडे,बालाजी वडजकर, माणिक मामा नाईकवाडे बारी पाटेल खुरगाव यांनी मार्गदर्शन केले आहे, या यशाबद्दल नागेश लुटे यांच्ये सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# निवृत्ती महाराज शाळेचे मैदानी क्रीडा स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, दि. ०१ ऑक्टोबर-**

क्रीडा व युवक संचनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी नांदेड यांच्या विद्यमाने तालुकास्तरीय शालेय १४,१७,१९ वयोगटातील मैदानी क्रिडा स्पर्धा दि.३० सप्टेंबर रोजी श्री सिध्दी विनायक मिल्ट्री कॅम्प कंधार येथे आयोजित करण्यात आल्या.शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत तालुक्यातील सर्व शाळेतील विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.कंधार येथील श्री संत निवृती महाराज विद्यालय भवानीनगर कंधारच्या विद्यार्थ्यांनी १४ वर्षाखालील मुलांमध्ये मैदानी क्रिडा स्पर्धत माधव पवार यांनी ६०० मी.धावणे स्पर्धेत तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला. तर १७ वर्षाखालील मुलांमध्ये प्रथमेश झंपलवाड यांनी ५ कि.मी.चालणे मध्ये तालुक्यांतून प्रथम क्रमांक पटकाविला.तर १७ वर्षाखालील वयोगटातुन कु.तेजस्विनी कंधारे हिने ३ कि.मी.चालणे स्पर्धेत तालुक्यातून प्रथम, तर १५०० मीटर धावणे मध्ये व्दितीय क्रमांक व ४०० मीटर हार्डल स्पर्धेत तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकाविला. कु.वैष्णवी केंद्रे हिने ३ कि.मी.चालणे स्पर्धेत तालुक्यातून द्वितीय क्रमांक पटकावला.या सर्व विद्यार्थ्यांची जिल्हा स्तरावर निवड झाली आहे.यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव बाबुराव पाटील गीरे,मुख्याध्यापक बाबुराव शिंदे,क्रिडा मार्गदर्शक नवनाथ तोरणे,गोटमवाड डि.के.,शिंदे जे.बी.,जोगपेठे एस.डी., सौ.कविता अवटे,कल्याणकर एन.व्ही.,कदम जतीन,हणमंते ए.व्हीं.,बालाजी देवकांबळे,माधव बरुरे सह सर्व कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून शुभेछा दिल्या.यशस्वी खेळाडूंना बहूमोल अस मार्गदर्शन क्रिडा शिक्षक नवनाथ तोरणे यांनी केले

## जुगार अड्ड्यावर धाड

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,-दि. ०१ ऑक्टोबर-**


नायगांव पोलीस ठाण्याच्या हादीतील गोदमगांव शिवरात तीरट नावाचा जुगार पैसे लाऊन खेळत आसल्याची गोपनिय माहीती पोलीस अधिक्षक यांच्या पथकाला मिळाल्याने धाड मारत ७लाख २८ हजार ३०० रूपायचा मुद्देमाल जप्त केला आहे.या प्रकरणात नऊ जनावर कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई २८ सप्टेंबर रोजी करण्यात आली आहे .

# सणाचे पावित्र्य राखून सन साजरा करावा: उपविभागीय पोलिस अधिकारी नायक

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. ०१ ऑक्टोबर-**

आगामी येणाऱ्या नवरात्र महोत्सव साजरा करीत असताना दुर्गा देवी मंडळांनी सणाचे पावित्र्य राखून सन साजरा करावा असे आव्हान दिनांक ३० सप्टेंबर रोजी घेण्यात आलेल्या शांतता कमिटीच्या बैठकीस ग्रामीण पोलीस ठाणे येथे पोलीस उपविभागीय अधिकारी सुशिलकुमार नायक यांनी दुर्गा देवी मंडळ व पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते यांना या बैठकीदरम्यान संबोधित केले.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे दिनांक ३० सप्टेंबर रोजी शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली या बैठकीत आगामी काळात येणारे नवरात्र महोउत्सव साजरा करत असताना कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता दुर्गादेवी मंडळांनी घ्यावी. कोणताही उत्सव शांततेत पार पाडला जावा दुर्गा देवी मंडळापासी



सीसीटीव्ही , अग्निशामक आवर्जून ठेवावेत जेणेकरून चुकीचे प्रकार घडणार नाही याची काळजी घ्यावी. परिसरातील आजपर्यंतच्या मंडळांनी व भावी भक्तांनी पोलीस प्रशासना सहकार्य केले असे सहकार्य पुढेही असावे असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांनी केले. यावेळी या बैठकीस ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलानी, नायब तहसीलदार स्वप्निल दिगलवार, मनपाचे सहाय्यक आयुक्त संभाजी कास्टेवाड, आरटीओ कार्यालयाचे अधिकारी मंजुषा भोसले, अग्निशामंदलाचे पी.सी. भोयर यांनी ही महत्त्वाच्या सूचना दुर्गा देवी मंडळास देण्यात आल्या.यावेळी या बैठकीस ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व पोलीस पाटील व दुर्गादेवी मंडळाचे पदाधिकारी, भावीक भक्त, सामाजिक कार्यकर्ते यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती सदरील बैठक यशस्वी पार पाडण्यासाठी गोपनीय शाखेचे बालाजी दंतापले व त्यांचे सहकारी टर्के यांनी परिश्रम घेतले.

# प्रा. लक्ष्मण हाके यांच्यावर हल्ला करणाऱ्यावर कारवाई करून तात्काळ अटक करा

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. ०१ ऑक्टोबर-**

ओबीसी भटक्या विमुक्त जाती या वंचित समूहाचे नेते प्रा. लक्ष्मण हाके यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा भोकर तालुका ओबीसी समन्वय समितीच्या वतीने निषेध करण्यात आला असून हल्ला करणाऱ्या समाजकंटकावर तात्काळ कारवाई करून अटक करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन १ ऑक्टेबर रोजी तहसीलदार भोकर यांना देण्यात आले. ३०सप्टेंबर रोजी पुणे येथे काही समाजकंटकाकडून प्रा. लक्ष्मण हाकेयांना जिवेमारण्याचा प्रयत्न करण्यात आला तसेच सोशल मीडियावर त्यांच्याबद्दल चुकीचे पोस्ट टाकून बदनामी करण्यात आली असे कृत्य करणाऱ्या समाज कंटकावर कारवाई करून तात्काळ कारवाई करावी अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही निवेदनात देण्यात आला

निवेदनावर ओबीसी नेते नामदेवराव आयलवाड, नागोरावजी शेंडगे, बी. आर. पांचाळ, एड. शेखर कुंटे नंदकुमार कोसबतवार सतीश देशमुख दिनेश लोणे सुरेश गुजवाड संजय देवकते, किशन सोळंके रामा भालेराव संजय शेंडगे संदीप कानकाटे संजय शेंडगे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# खालच्या पातळीवर जाऊन राजकारण करू नये : बालाजी पाटील खतगांवकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ०१ ऑक्टोबर-**

शिवसेना जनसंपर्क कार्यालय मुखेडपासून दिनांक १ ऑक्टोबर रोजी सुरू झालेल्या 'परिवर्तन महारॅली'चा समारोप मष्णेर येथे झाला. जेसीबीच्या साहाय्याने फुलांची उधळण करीत ठिकठिकाणी या रॅलीचे स्वागत करण्यात आले. ह्यावेळी बालाजी पाटील खतगांवकर ह्यांनी तालुक्यात गलिच्छ राजकारण करणार्यांना चांगलेच सुनावले. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्राच्या लोककलेने आणि महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.

''या तालुक्यात रस्त्याचे, बेरोजगारांची, सरकारच्या योजनांची माहिती पोहोचवण्यासाठी बालाजी पाटील खतगांवकर यांना निवडून द्यायचं आहे. खतगावकर प्रत्येकाची व्यथा जाणून घेत असून ते २ वर्षांपासून विकासाचा आराखडा तयार करत आहेत. विकास करायचा असेल तर बालाजी पाटील खतगांवकर यांना निवडून द्या. ही लढाई कोणत्या पक्षाची नसून सर्वसामान्य माणसांची आहे. ते जनतेचे, शेतकरी, बेरोजगारांचे आणि महिलांचे प्रश्न सोडवण्याचे उमेदवार आहेत. आतापर्यंत निवडून आलेल्यांनी आतापर्यंत काय केले? मतदारसंघातील गरीब माणसांपर्यंत बालाजी पाटील खतगांवकर पोहोचणार आहेत,'' असे प्रतिपादन सुभाषराव काटे यांनी केले.

''मुखेडमध्ये धनशक्तीच्या विरूद्ध जनशक्ती तयार झाली आहे. परिवर्तन हे मतदानाच्या रूपाने झाले पाहिजे. पैशाच्या जोरावर लोकप्रतिनिधी सत्ता भोगत आहेत. सत्तेची भूक असलेल्या माणसाची



नशा बालाजी पाटील खतगांवकर उतरवू शकतात. हाटकर समाजानंतर लिंगायत समाजाचे मतदान आता बालाजी पाटील खतगांवकर यांच्या पाठीशी आहे, असे श्रावण नरभागे यांनी स्पष्ट केले.

''ही इतिहास घडवणारी रॅली आहे. मतपेटीतून राजा निर्माण होतो. आम्ही पळणारे नाही. बालाजी पाटील खतगांवकर यांच्यासारखा हिरा तालुक्याला लाभला आहे. येणाऱ्या काळात त्यांच्याकडून विकास होऊ शकतो. त्यांना आपल्याला आमदार करायचे आहे. येथे सर्वसामान्यांची बिकट परिस्थिती झाली आहे. हजारो लोकांचे काम त्यांनी केलीत. सगळ्या क्षेत्रात मुखेड तालुक्याचे नाव येणाऱ्या काळात पुढे येईल. स्वातंत्र्य मिळूनही तालुक्याचा विकास झाला नाही. अनेकांना निवडून दिले तरी हा भाग विकासापासून वंचित राहिला आहे. तुमच्यावर कोणतेही संकट येऊ द्या, तुमची आर्थिक परिस्थिती नसेल तर बालाजी पाटील खतगांवकर त्यासाठी खंबीर असतील. जर ते निवडून आले तर त्यांच्याकडून लेंडी धरणग्रस्तांसाठी ११ लाख रुपये घेतल्याशिवाय शांत बसणार नाही,'' असे आश्वासन व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांनी दिले.

'तालुक्याची परिस्थिती भयानक झाली आहे. येथे अजून रस्ते नाहीत. दवाखाना नाही, स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण पण येथे एमआयडीसी नाही. अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळयासाठी मुखेड तहसील कार्यालयाजवळ जागा निश्चित करण्यात आली आहे. मष्णेरचा सर्वांगीण विकास केल्याशिवाय शांत राहणार नाही. येथील सर्व समस्या दूर करून देवस्थानाला पर्यटन स्थळाचा दर्जा दिला जाईल. कोणीही खालच्या पातळीवर जाऊन राजकारण करू नये,'' असे यावेळी बालाजी पाटील खतगांवकर यांनी स्पष्ट केले. तसेच यांनी मष्णेर देवाच्या आशीर्वादाने मुखेड आणि कंधार विधानसभा क्षेत्रातील सर्व समाज बांधवांच्या विकासाची शपथ घेतली.

यावेळी व्यंकटराव पाटील गोजेगावकर (माजी शिक्षण सभापती जिल्हा परिषद, नांदेड), अशोक पाटील रावीकर (माजी सभापती), बालाजी पाटील खतगांवकर (खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य), शंकर पाटील लुटे (शिवसेना ज्येष्ठ नेते), डॉ. रामराव श्रीरामे, माधव पाटील बामणीकर (मष्णेर देवस्थान प्रमुख), सुभाषराव काटे (शिवसेना माजी जिल्हा प्रमुख, लातूर), श्री. सौ. मीराताई मुंडे (शिवसेना तालुकाप्रमुख), गुणवंतराव पाटील हंगरगेकर (शेतकरी नेते), शिवराज पाटील मसलगेकर (शेतकरी नेते), काशी पाटील हाक्के, श्रीकांत काळे (सरपंच बेन्नाळ) यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ देखील उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास आरोग्य मंत्रालयाचा हिरवा कंदील

## राजकीय पक्ष, व्यापारी संघाकडून फटाक्यांची आतिषबाजी करीत जल्लोष



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ आक्टोबर**

हिंगोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला केंद्र शासनाच्या आरोग्य मंत्रालयाने हिरवा कंदील दाखविला असून त्याबाबतचे पत्र मिळाले आहे. त्यामुळे वैद्यकीय प्रवेशाच्या तिसऱ्या राऊंडमध्ये हिंगोली येथील महाविद्यालयात प्रवेश घेता येणार आहे. या मंजुरीनंतर विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच व्यापारी संघाच्यावतीने येथील गांधी चौकात फटाक्यांची आतिषबाजी करीत जल्लोष साजरा करण्यात आला.

हिंगोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या मंजुरीनंतर या ठिकाणी भौतिक सुविधा, स्टाफ नसल्याचे कारण सांगून राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला ब्रेक लावला होता. त्यानंतर महाविद्यालय प्रशासनाने त्यांच्याकडेच अपील दाखल केले होते. मात्र दुसरे अपील देखील फेटाळून लावले होते.

दरम्यान, हिंगोली शासकीय वैद्यकीम महाविद्यालय सुरू व्हावे यासाठी जिल्हाधिकारी अभिनवगोयल, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ चक्रधर मुंगल, जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ नितीन तडस यांनी शासनाकडे पाठपुरावा सुरू केला होता. यामध्ये केंद्राच्या आरोग्य मंत्रालयाचे अपील दाखल केले होते मात्र आरोग्य मंत्रालयाने शासकीय रूग्णालयात रूग्णांची संख्या कमी असल्याचे कारण सांगत विद्यार्थी प्रवेशाला टाळाटाळ सुरू केली होती. मात्र अधिकाऱ्यांनी रूग्णालयातील ओपीडी रजिष्टरच्या छायांकित प्रतीच त्यांच्याकडे पाठविल्या होत्या. त्यानंतर आरोग्य मंत्रालयाने ऑनलाईन सुनावणी घेऊन १०० विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला हिरवा कंदील दाखविला आहे. याबाबतचे पत्र महाविद्यालय प्रशासनाला पाठविले आहे. तसेच याठिकाणी विद्यार्थी प्रवेशासाठी मान्यता देण्याबाबत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगालाही कळविले आहे. त्यामुळे आता वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महाविद्यालयासाठी भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या इमारतीमध्ये वैद्यकीय महाविद्यालय सुरू होणार आहे. सध्या वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश धेतले जात असून त्याचा दुसरा राऊंड सुरू आहे. आता तिसऱ्या राऊंडमध्ये हिंगोलीच्या समावेश होऊन हिंगोलीच्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे. केंद्राच्या या पत्रानंतर आता महाविद्यालय प्रशासनाने नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे माहीती देण्याची तयारी सुरू केली असून काही दिवसांतच नाशिक येथील पथक हिंगोलीत दाखल होणार आहे. यावेळी भौतिक सुविधा, स्टाफ यांची पाहणी करणार आहे. हिंगोली शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ चक्रधर मुंगल म्हणाल्या की, हिंगोली येथील वैद्यकीय महाविद्यालयात स्टाफ भरण्यासाठी सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, यवतमाळ या ठिकाणावरून प्राध्यापकांची नियुक्ती केली आहे. केंद्रीय मंत्रालयाची खात्री पटल्यानंतर त्यांनी प्रवेशाला मंजुरी दिली आहे. याचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या मंजुरीनंतर येथील गांधी चौकात हिंगोलीकरांनी फटाक्यांची आतिषबाजी करीत जल्लोष साजरा केला. यावेळी नंदकिशोर तोष्णीवाल, बसंत भट्ट, जगतीराज खुराणा, अनील नैनवाणी, माबुद बागवान, शेख नईम शेख लाल, सुरेश अप्पा सराफ, शाम खंडेलवाल, प्रशांत सोनी, रवी सोनी आदींची उपस्थिती होती.

# सणासुदीमुळे दुकानांची वेळ वाढविण्यात यावी

## व्यापारी महासंघाची पोलिस अधीक्षकांकडे मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ आक्टोबर**

आगामी काळात अनेक महत्वाचे सण आणि उत्सव असल्यामुळे व्यापाऱ्यांनी तयारी केली आहे. या काळात दुकानांमध्ये मोठी गर्दी होणार असून पोलिस प्रशासनाने रात्री अकरा वाजेपर्यंत व्यापारी प्रतिष्ठाने सुरू ठेवण्याची परवानगी द्यावी, या मागणीचे निवेदन मंगळवारी व्यापारी महासंघाकडून पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचेकडे सादर केले आहे.

श्रीगणेशोत्सव आणि महालक्ष्मी सणानंतर आता दसरा, दिवाळी तसेच इतर महत्वाचे सण साजरे केल्या जातात. यादृष्टीने व्यापाऱ्यांनीही तयारी केली आहे. गर्दी होत असल्यामुळे व्यापारी प्रतिष्ठाने आणि आस्थापना बंद होण्यास रात्री उशिर होत आहे. दिवसभर ग्रामीण भागातील ग्राहक आणि सायंकाळी शहरी भागातील ग्राहक, नोकरदार वर्ग यांना खरेदी करीता वेळ उपलब्ध होत असतो. त्यामुळे साहजिकच व्यापाऱ्यांना सुध्दा त्यांची प्रतिष्ठाने जास्त वेळापर्यंत चालू ठेवावी लागत आहेत. त्यामुळे आगामी सण आणि उत्सवाच्या काळात जिल्ह्यातील व्यापारी आणि व्यावसायिक यांना त्यांची प्रतिष्ठाने बंद करण्याकरिता रात्री दहा ऐवजी अकरा वाजेपर्यंत सुरू ठेवण्याबाबत परवानगी द्यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष नंदकिशोर तोष्णीवाल, अनिल नैनवाणी, संजय देवडा, प्रकाश इंगोले, शेख नईम शेख लाल, शाम खंडेलवाल, सुमित चौधरी, बसंत भट्ट, जगजीतराज खुराणा, माबुद बागवान, प्रशांत सोनी, सुरेशअप्पा सराफ, नौमान नईम शेख, जुबेर मामू आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शासनाकडून विमा कंपनीला १५८ कोटींचा निधी मिळण्याची प्रतिक्षा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ आक्टोबर**

जिल्ह्यात अतिवृष्टीच्या नुकसानीपोटी २५ टक्के अग्रीम रक्कम देण्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आदेश दिले आहेत. मात्र अद्याप शासनाकडून १५८ कोटींचा निधी विमा कंपनीकडे वर्ग झाला नसल्याने ३ लाख ७ शेतकऱ्यांनी अग्रीमसाठी आणखी काही दिवस वाट पहावी लागणार आहे. आता शासनाकडून निधी कधी वर्ग केला जाणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

हिंगोली जिल्ह्यात यावर्षी १ आणि २ सप्टेंबर रोजी तब्बल १४१ मिलीमीटर पाऊस पडला आहे. अतिवृष्टीमुळे सोयाबीन सह इतर पिकांचे नुकसान झले. हाती आलेले पीक वाया गेल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले होते. जिल्ह्यातील परिस्थिती लक्षात घेता जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी मध्य हंगाम प्रतिकुल परिस्थिती लागू करण्यासाठी तातडीने नुकसानीची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार जिल्ह्यातील ३० मंडळामध्ये पाहणी करून अहवाल सादर करण्यात आला होता.

त्यानंतर जिल्हाधिकारी गोयल, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये शेतकऱ्यांना २५ टक्के पीकविमा अग्रीम देण्याचे आदेश जिल्हाधिकारी गोयल यांनी पिकवीमा कंपनीला दिले आहेत. यामुळे जिल्ह्यातील ३ लाख ७ हजार शेतकऱ्यांना १५८ कोटी रूपयांचा अग्रीम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला होता.

दरम्यान, शासनाने पिकवीमा कंपनीला सदर रक्कम वर्ग केल्यानंतरच विमा कंपनीकडून पीकविमा अग्रीम दिला जाणार आहे. अद्यापही शासनाने सदर रक्कम विमा कंपनीकडे वर्ग केली नसल्याने पीकविमा देण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. सदर रक्कम मिळण्यासाठी विमा कंपनीकडून शासनाकडे पाठपुरावा केला जात असून पुढील काही दिवसांतच ही रक्कम मिळणार असल्याचे सांगण्यात आले आहे. सध्यातरी जिल्ह्यातील ३ लाख ७ हजार शेतकऱ्यांचे शासनाकडे तसेच विमा कंपनीकडे लक्ष लागले असून शासनाकडून रक्कम कधी वर्ग केली जाणार याची प्रतिक्षा लागली आहे.

अग्रीम रक्कम मिळणाऱ्या शेतकऱ्यांची तालुकानिहाय आकडेवारी पुढील प्रमाणे आहे. औंढा नागनाथ तालुक्यातील ४९ हजार ९२० शेतकरी, वसमत तालुक्यातील ६८ हजार ५८९ शेतकरी, हिंगोली तालुक्यातील ५९ हजार ५५४ शेतकरी, सेनगाव तालुक्यातील ७० हजार ९२ शेतकरी तर कळमनुरी तालुक्यातील ५८ हजार ९०३ शेतकऱ्यांचा समावेश आहे.



**हिंगोली–.येथील सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्यावतीने कृषी व औद्योगित प्रदर्शनीमधील गाळ्यांची सोडत काढण्यात आली. यावेळी सार्वजनिक दसरा समितीचे अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ, दौलत बनसोडे, उरेवार, सुधाकर सराटे यांच्यासह गाळे घेण्यासाठी आलेले व्यापारी उपस्थित होते. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### अवैध दारूविक्री करणाऱ्या महिलेविरूध्द गुन्हा

हिंगोली– सेनगाव तालुक्यातील जांबआंध येथील शिवारात शेतातील आखाड्यावरील पत्र्याचे टीनशेडच्या पाठीमागे हळदीच्या शेतात आरोपी वृंदाबाई वसंता बंदुके ही महिला स्वत:च्या फायद्यासाठी विनापरवाना, बेकायदेशीररित्या देशी दारूची चोरटी विक्री करीत असतांना सेनगाव पोलिसांनी छापा मारून ८ हजार ४०० रूपयांची देशी दारू जप्त केली आहे. याप्रकरणी ओमनाथ राठोड यांच्या फिर्यादीवरून सेनगाव पोलिस ठाण्यात सदरील महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास जी ए मस्के हे करीत आहेत.

### दुर्गा महोत्सवानिमित्त दुकानांत ग्राहकांची गर्दी

हिंगोली– जिल्ह्यासह शहरात दुर्गा महोत्सवानिमित्त विविध ठिकाणी दुर्गामंडळांच्यावतीने दुर्गादेवीची स्थापना करण्यात येणार आहे. यानिमित्त शहरातील दुकानांमध्ये देवीला घातले जाणारे विविध दागीने आणि सजावटीच्या वस्तू विक्रीसाठी आल्या आहेत. या दुकानांमध्ये दुर्गामंडळांचे पदाधिकारी खरेदी करिता मोठी गर्दी करतांना दिसत आहेत.

### जिल्हास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धांना सुरूवात



हिंगोली–क्रिडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय हिंगोली आयोजित हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशन हिंगोली यांच्या संयुक्तविद्यमाने जिल्हास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा सन २०२४–२५ दोन दिवसीय कबड्डी क्रीडा स्पर्धा तालुका क्रीडा संकुल हिंगोली येथे आयोजित करण्यात आली आहे. कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन पोलीस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश मारावार, क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, क्रीडा अधिकारी गणेश बोडखे, कबड्डी स्पर्धेचे पंच म्हणून शिवाजीराव इंगोले, रमेश गंगावणे, रामप्रकाश व्यवहारे, रावसाहेब गेंडाफळे, सोपान नाईक, दत्तराव बांगर, नरवाडे, सत्यप्रकाश नांदापूरकर, मेहराज खा पठाण, बल्लू पठाण, माधव कोरडे, दिलीप गव्हाणे, बाळू पाटील, आधी उपस्थित होते. जिल्हास्तर शालेय कबड्डी स्पर्धेत १४ वर्षीय वयोगटातील मुला मुलींचे १० संघ, १७ वर्षीय वयोगटातील मुला मुलींचे १० संघ, आणि १९ वयोगटातील ज मुला मुलींचे १० संघ, जिल्हास्तर शालेय कबड्डी स्पर्धेसाठी एकूण ३० संघ आले होते. या स्पर्धा अत्यंत चुरशीच्या होत असून प्रेक्षकांची मोठी गर्दी होत आहे.

# आर्य वैश्य समाजाचा एनटीसीमधील मोकळा भूखंड देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ आक्टोबर**

शहरातील एनटीसी भागात सकल आर्यवैश्य समाजाच्या माता कन्यका माता परमेश्वरी उद्यानासाठी नगर पोलिकेने ठरावाद्वारे मंजुर केलेला भुखंड देण्याची मागणी सकल आर्य वैश्य समाजाच्यावतीने मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांचेकडे निवेदनाक्षद्वारे केली आहे.

मागील दोन वर्षापूर्वी हिंगोली नगर पालिकेने शहरातील एनटीसी भागातील सर्वे क्रमांक १४, १४४/२ मधील मोकळा भूखंड ज्याचे एकूण क्षेत्रफळ २६६८.११ चौरस मीटर असून माता कन्यका माता परमेश्वरी उद्यानासाठी देण्याचा ठराव सभागृहात मंजुर केला आहे. सदर मोकळा भूखंड आर्य वैश्य समाज हिंगोली यांच्या ताब्यात देण्यात यावा अशी मागणी मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर पत्रकार डॉ विजय निलावार, कांता व्यवहारे, सचिन गुंडेवार, स्वप्नील गुंडेवार, ज्ञानेश्वर मामडे, कांता गुंडेवार, आनंद निलावार, आशिष पिंगळकर, विकास काप्रतवार, सचिन निलावार, संतोष प्रतापवार, प्रल्हाद बासटवार, व्यंकटेश दमकोंडवार, ॲड अशोक डुब्बेवार, संचीत गुंडेवार आदींची उपस्थिती होती.

# पुरवठा निरीक्षक हेमा खाडे यांच्याकडून रास्त भाव दुकानदारांना मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ आक्टोबर**

औंढा तहसील कार्यालयातील सभागृहामध्ये एक ऑक्टोबर रोजी स्वस्त धान्य दुकानदारांची तहसीलदार हरीश गाडे यांच्या मार्गदर्शनाखालीबैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीस पुरवठा निरीक्षण अधिकारी हेमा खाडे म्हणाल्या, औंढा तालुक्यातील रेशन लाभार्थ्यांची केवायसी करून घ्या .मोबाईल शेडिंग करा, धान्य वितरण १००% करा,.गौरी गणपतीच्या ज्या दुकानदारांनी कीट वाटप केल्या नाही त्यांनी तात्काळ वाटप कराव्यात तसेच स्वस्तधान्य दुकानदाराच्या बैठकीमध्ये अडीअडचणी देखील जाणून घेतल्या व सूचना देखील करण्यात आल्या. यावेळी पुरवठा अव्वल कारकून इम्रान पठाण, कल्याणी हटवार, अतुल पायघन, कैलास जाधव, नागेश दिपके यांच्यासह औंढा नागनाथ तालुक्यातील स्वस्तधान्य दुकानदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोतवाल संघटनेचे विविध मागण्यांचे तहसीलदारांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ आक्टोबर**

महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटना तालुका शाखा औंढा नागनाथ च्यावतीने एक ऑक्टोबर मंगळवारी तहसीलदार हरीश गाडे यांना निवेदन दिले. कोतवालांच्या सेवा वरिष्ठ कार्यालयात सलंगणीत न करता संबंधित त्या त्या सज्जा कार्यालयात वर्ग कराव्या अशी मागणी केली.

संपूर्ण कोतवाल संवर्गातील कर्मचारी यांची नियुक्ती मूळ पद स्थापना तलाठी सज्जा या ठिकाणी करण्यात आलेली असून बरेच कोतवाल यांच्या सेवा वरिष्ठ कार्यालयास विविध आदेशाने सलग्नित करण्यात आलेले आहेत त्यामुळे कोतवालांच्या सेवा वरिष्ठ कार्यालयात सलग्नित न करता संबंधित त्या त्या सज्जा कार्यालयात वर्ग करावे याबाबत हे निवेदन देण्यात आले आहे .

यावेळी कोतवाल संघटनेचे जिल्हाध्यक्ष विशाल भुक्तर, गणेश जायभाये, किशन फलटणकर, संदीप मुंडे, केशव फलटणकर, विष्णु गिरी, तुकाराम पोले, गोरख वाघमारे, दीपक जाधव, रेश्मा खिल्लारे, मिरा बेले, जुही घोडे, पूजा गिऱ्हे, सविता भिसे, पुण्यरथा चिभडे, सुरेश डोंगरे राजू पुंडगे, गणेश माहुरे यांच्या निवेदनावर स्वाक्षरी आहेत.

# सांदीपनीचे संचीत चौधरी, दिप्ती देशमुख यांची विभागीय सायकलींग स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ आक्टोबर**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,नांदेड शहर महानगर पालिका,नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय सायकलिंग रोड रेस क्रीडास्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये सांदिपनी पब्लिक स्कूल,सुनील नगर,तरोडा बु.नांदेड येथील १४ वर्ष (मुले) वयोगटामध्ये सायकलिंग रोड रेस (टाईम ट्रायल) मध्ये संचित संदीप चौधरी यांनी प्राविन्या संपादन केलेले आहे. तसेच तसेच १४ वर्ष (मुली) वयोगटातील सायकलिंग रोड रेस (मास स्टार्ट) मध्ये कु. दीप्ती दत्तात्रय देशमुख हिने प्रथम क्रमांकाचे सुवर्ण पदक पटकाविले असून या दोन्ही खेळाडूंची दि.२२ ते २३ ऑक्टोबर २०२४ दरम्यान पोलीस मुख्यालय मैदान, नांदेड येथे होणाऱ्या विभागीय शालेय सायकलिंग रोड रेस क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या निवडीबद्दल शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ.माहेश्वरी मुकुल राठोड,सौ. रेश्मा विपुल राठोड प्राचार्या क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ.हरप्रीत कौर, प्रशासक मेकाले, क्रीडाशिक्षक व मार्गदर्शक भाऊराव राठोड, शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.